नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २३६ * * अमरावती * बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!!

## सत्येंद्र जैनविरुद्ध मनी लाँड्रिंगचा गुन्हा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी जमीन व्यवहार घोटाळ्यात मनी लाँड्रिंग केल्याबद्दल आप नेते सत्येंद्र जैन यांच्यावर खटला चालवण्यास परवानगी दिली. १४ फेब्रुवारी रोजी केंद्रीय गृह मंत्रालयाने या प्रकरणात राष्ट्रपतींकडून मंजुरी मागितली होती.

दिल्लीचे माजी आरोग्यमंत्री जैन यांच्याविरुद्ध बीएनएसच्या कलम २१८ अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल. राष्ट्रपतींकडून मंजुरी मिळाल्यानंतर, अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आता लवकरच जैन यांना अटक करू शकते. सत्येंद्र जैन यांच्यावर हा खटला दाखल झाला तेव्हा ते आमदार होते. खटला चालवण्यासाठी राष्ट्रपतींची परवानगी आवश्यक होती.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## पुतिन सरळ झाले

रशियाचे तहहयात अध्यक्ष पुतीन यांची अखेर युक्रेन बरोबर बोलणी करण्याची तयारी दर्शवली. ट्रम्प यांचा कारभार त्यांनी पदग्रहण केल्यानंतर पुतीन सुद्धा बघत आहेत. ट्रम्प यांनी पुतीनला विनाकारणाचे युद्ध थांबवावे, असा सल्ला दिला आहे. जे काम पुतीन 36 दिवसात करणार होते. ते 36 महिन्यातही करू शकलेले नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. तिकडे अमेरिकेने जगातील अनेक बांडगुळे आता अमेरिका पाळणार नाही. हे घोषित करून टाकलेले आहे. आपल्या डोक्यावर महाभयानक कर्ज आहे आणि ते वाढतच आहे. अमेरिका म्हणजे 'बडे घर पोकळ वासा' अशी परिस्थिती आहे. म्हणजेच भारताचा आदर्श बहुतेक अमेरिकेने घेतला असावा. भारतही अमेरिकेकडून कर्ज घेतो. इतर देशाकडूनही कर्ज घेतो. मग अफगाणिस्तान, श्रीलंका, नेपाळ, मालदीव देशांना कर्ज देतो. हा प्रकार आता अमेरिकेच्या नव्या अध्यक्षांनी बंद करणार असल्याचे घोषित केलेले आहे. ट्रम्प पक्के उद्योगपती व्यापारी आहेत. व्यापारात नफा झाला नाही. तर तो व्यापार टिकू शकत नाही. हे ट्रम्प यांना पुरेपूर ठाऊक आहे. यामुळे आता ट्रम्प यांनी विनाकारणची दयामया न दाखवता जगातील सर्व देशांना चक्क इशारा देऊन टाकलेला आहे. जेवढा आयात कर तुम्ही लावाल. तेवढाच आम्ही लावू. असा सरळसोट व्यवहार आहे. ट्रम्प यांचे अदानी म्हणजे एलन मस्क आहेत. त्यांच्याकडे तर सरकारी खर्चात कशी कपात करता येईल. याचे अधिकारच दिलेले आहेत. त्यामुळे फारसा विचार न करता भारताचे 182 कोटी, बांगलादेशासह मोझांबीकचे 87 कोटी, नेपाळचे 174 कोटी, लायबेरियाचे 13 कोटी अशा दानधर्माच्या गोष्टी आता मस्क साहेब चालू देणार नाहीत. ट्रम्प यांना त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जगात शांतता हवी आहे. यामुळेच ट्रम्प यांच्या अधिकार ग्रहणाच्या मुहूर्तावरच इस्त्राइल आणि हमास यांची लढाई थांबवण्यात आली. तरीही हमासने नखरे करताच ट्रम्प त्यांना गंभी द्यायला विसरले नाहीत. हे सर्व पाहून पुतीन यांनाही बहुदा सुबुद्धी सुचली असावी. खरे पाहिले तर युक्रेन आणि रशिया या दोघांनाही पहिल्यांदा शांततेचा संदेश दिला तो आपल्या मोदी साहेबांनी. आता मोदीजींनी पाया रचला आणि ट्रम्प यांनी त्यावर कळस चढवला. जी धमकी ट्रम्प यांनी हमासला दिली होती. तीच धमकी ते रशियालाही देतील अशी भीती मनात असल्यामुळे पुतीन यांनी युक्रेन बरोबर चर्चा करण्याचे ठरविले असावे. युक्रेनचा सत्यानाश झालेला आहे. तरीही युक्रेन अजूनही ताठ मानेने उभा आहे. तिकडे ट्रम्पची लहर फिरली आणि रशिया विरुद्ध त्यांनी कहर केला?. तर आधीच गाळात रुतलेली रशियाची अर्थव्यवस्था फार रसातळाला जाईल. हे हुशार पुतीन यांना बरोबर कळलेले असावे. यामुळेच बहुदा पुतीन यांनी हा पवित्र घेतला असावा. गेल्या तीन वर्षात भारताला स्वस्त भावात क्रूड ऑइल देऊन रशियाला भारताकडून बरीच मदत मिळाली. त्यातून रशियाचा युद्धखर्च चालला. भारताला हे तेल पाश्चिमात्य राष्ट्रांना विकून भरपूर नफा कमविता आला. आता पुढे काय होईल. युद्ध थांबेल काय, रशियाने आक्रमण केल्यामुळे युक्रेनचे आतापर्यंत जे नुकसान झालेले आहे. त्याची भरपाई रशिया करेल काय. हे प्रश्न स्वाभाविकच पुढे येतील. युद्ध करून काहीही फायदा नाही हे मोदीजींनी सांगितलेले होतेच. हे आता पुतीन यांना पटवून घ्यावे लागले. रशियाजवळ खनिज संपत्तीचा मोठा साठा आहे. अमेरिकेने बंदी घातल्यामुळे रशियाला आम्ही वर म्हटल्याप्रमाणे त्यांचा व्यापार व्हाया भारत करावा लागला. म्हणजेच भारता द्वारे जगभरात आपले तेल विकावे लागले. आता ट्रम्प यांनी भारतालाही आमचे तेल घ्या असे सांगूनच टाकलेले आहे. हे सर्व धोके ओळखून आणि आयतीच ट्रम्प यांची संधी साधून पुतीन यांनी आपले पाय मागे खेचलेले असावेत. आधुनिक जगात लढाया लढणे म्हणजे आपली आत्महत्या करण्यासारखी आहे. जगातील इस्त्राइल- हमास आणि युक्रेन- रशिया ही दोन्ही युद्ध थांबवण्यात आल्यामुळे ट्रम्प यांची गणना आता शांतीदुतांमध्ये होऊ शकते. दादागिरी दाखवून का होईना, ट्रम्प यांनी यांची शहाणपणाची सूचना निश्चितच जगाला शांततेकडे घेऊन जाईल, यात शंका नाही. मिस्टर ट्रम्प दिसतात तसे नाहीत. ते हिशेबा हिशेबाने आपल्या फायद्याचा हिशोब करतात. आपल्या फायद्याचे हिशोब करताना ते इतरही बराच हिशोब करतात. हे सुद्धा आता आपल्याला दिसून आलेले आहे. म्हणजे आता युक्रेनला मदतीची गरज नाही. हा बादरायण संबंध जोडला. तरी ट्रम्प यांचा हा एक्का आपला हुकूम बजावण्यात यशस्वी झालेला आहे. त्यामुळेच पुतीन सरळ झालेले आहेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मंत्रिमंडळ बैठकीपूर्वीच अजेंडा आला बाहेर
# मंत्र्यांवर संतापले फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातील मंत्र्यांवर उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. मंत्रिमंडळ बैठकीआधीच घेण्यात येणाऱ्या निर्णयांची माहिती प्रसार माध्यमांपर्यंत पोहोचवणाऱ्या अधिकाऱ्यांना कारवाईचा इशारा दिला आहे.

देवेंद्र फडणवीस यांना पत्रकार परिषदेवेळी मंत्रिमंडळाच्या एका संभाव्य निर्णयाबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी त्यांनी मंत्र्यांवर नाराजी

**कारवाईचे संकेत**

व्यक्त करत खडेबोल सुनावले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मंत्रिमंडळ बैठक होण्याचा अजेंडा छापणे चुकीचे आहे. बैठक होण्यापूर्वी काही लोक अजेंडा छापत आहे. याबाबत मी मंत्र्यांनाही सांगितले आहे. मंत्र्यांनी आपल्या कार्यालयांना बैठकीपूर्वी अजेंडा न छापण्याचे सांगितले पाहिजे. अन्यथा मला कारवाई करावी लागले. हा अजेंडा गुप्त असतो. त्या गुप्ततेची शपथ आपण घेतली आहे.



तसेत माध्यमांनी सुद्धा आपल्या खपासाठी आणि टीआरपीसाठी नियम मोडू नये.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याण डोंबिवली महापालिका परिसरातील घरांच्या विषयावर देखील भाष्य केले आहे. कल्याण डोंबिवली संदर्भात मी स्वतः बैठक घेत आहे. या ठिकाणी गरजू लोकांची घरे कशी वाचवता येईल, त्याचा विचार केला जाणार आहे. त्यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयात देखील जाऊ.

## सहाव्या वित्त आयोगाची स्थापना

**मंत्रिमंडळाचा निर्णय**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
केंद्र, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वित्तीय समतोल राखण्याच्या उद्देशाने सहाव्या राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. हा आयोग १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी शिफारशी करेल. आयोगाने आपला अहवाल ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावा, अशी मुदत देण्यात आली आहे.

तब्बल एक वर्षाने सहाव्या आयोगाची स्थापना होत आहे. आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या निवडीचा अधिकार मुख्यमंत्र्यांना देण्यात आला असून, त्यांची अंतिम शिफारस राज्यपालांकडे केली जाईल. सहावा राज्य वित्त आयोग पंचायती आणि नगरपालिका यांची आर्थिक स्थिती पुनरावलोकन करेल.

राज्याकडून मिळणाऱ्या कर, शुल्क, पथकर आणि फीमधून निर्माण होणारे निव्वळ उत्पन्न पंचायती आणि नगरपालिका यांच्यात योग्य पद्धतीने विभागण्यासंबंधी शिफारशी करेल. दरम्यान, मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत इतरही काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



## महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने गाठला देवळी इस्पात कंपनीचा परिसर

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १८ :
देवळी येथील औद्योगिक वसाहतीतील एसएमडब्ल्यू इस्पात स्टील कंपनीमुळे गेल्या १० वर्षांपासून वायु प्रदूषणाची समस्या आहे. रात्रीच्याच वेळी जाणीवपूर्वक चिमणी ऐवजी थेट प्लांट शेडमधून विषारी वायू सोडला जातो. कंपनीने प्रदूषण नियंत्रणासाठी कोणतीही योग्य व्यवस्था केलेली नसल्यामुळे, संपूर्ण देवळी शहराच्या हवेची गुणवत्ता बिघडली आहे.

अखेर प्रदूषण मंडळाने तक्रारीची दखल घेत देवळी येथील पूर्वाश्रमीच्या महालक्ष्मी (एसएम डब्लयू इस्पात) कंपनीचा परिसर गाठून प्रदूषण नियंत्रण सयंत्र परिसरात उभे करीत तपासणी करुन गेले.

कंपनीच्या प्लांटमधून विषारी धूर थेट वातावरणात सोडला जातो. चिमणीचा वापर न करता थेट उत्सर्जन केल्याने प्रदूषणाची तीव्रता अधिक आहे. हिवाळ्यात धुक्यासारखा विषारी धूर पसरून लोकांना श्वास घेणे कठीण होते. स्थानिक लोकांमध्ये श्वासाच्या आजारांसह, डोळ्यांत जळजळ, छातीत दुखणे, आणि कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. दुषित वातावरणामुळे मुलांमध्ये श्वसनाचे आजार बळावले आहेत.

कायद्यानुसार, औद्योगिक एककांनी उत्सर्जन नियंत्रणासाठी चिमणी व फिल्टर सिस्टम लावणे बंधनकारक आहे. या कंपनीने हे नियम पूर्णतः दुर्लक्षित केले आहेत. तक्रारदार समाजसेवक किरण ठाकरे व देवळी वासीयांनी कंपनीतील वायू प्रदूषित घटनाक्रमासह आजपावेतो घडलेल्या अपधातासंदर्भात जिल्हाधिकारी व कंपनी प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या. आता एकाच आठवड्यात दोन वेळा प्रदूषण मंडळाने संयत्रासह चमू पाठवित तपासणी केली. परंतु तक्रारदार म्हणून मला कुठलीच सुचना वा अहवाल अद्यापही दिला नाही. त्यामुळे मंडळाच्या कारवाईकडे लक्ष असल्याचे किरण ठाकरे यांनी सांगितले.

एसएम डब्लयूचे इस्पात कंपनीचे उपाध्यक्ष आशिष भट, श्याम मुंधडा, कार्पोरेट अफेयर लायज्निंग, कंपनीचे निर्माते दिपक सुमद, लॅब टेक्निशियन सुधाकर साहू, प्रॉडक्शन हेड संदिप येसनखेडे, प्लॅन्ट ऑपरेटर सुमेश आर, प्लॅन्ट हेड जितेंद्र पाल यासह इतर प्रशासनाशी प्रतिनिधीने संपर्क साधला असता कुणाकडूनही कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कंपनीची बाजू समजू शकली नाही.



## प्रयागराजमध्ये गंगा-यमुनेचे पाणी
# स्नानासाठी अयोग्य...

**सेंट्रल पोल्यूशन कंट्रोल बोर्डाकडून पाण्याची टेस्ट**

■ वृत्तसंस्था, दौसा, दि. १८ :
प्रयागराज महाकुंभात गंगा-यमुनेच्या संगमावर स्नान सुरू आहे. आतापर्यंत ५४ कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केले आहे. दरम्यान, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एक अहवाल समोर आला आहे ज्यामध्ये दोन्ही नद्यांचे पाणी आंघोळीसाठी योग्य नसल्याचे म्हटले आहे. सीपीसीबीने १७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणला आपला अहवाल सादर केला. सीपीसीबीने ९ ते २१ जानेवारी दरम्यान प्रयागराजमधील एकूण ७३ वेगवेगळ्या ठिकाणांहून नमुने गोळा केले. आता त्याच्या चौकशीचे निकाल जाहीर झाले आहेत.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या अहवालात गंगा आणि यमुना नद्यांच्या पाण्याची एकूण ६ पॅरामीटर्सवर चाचणी करण्यात आली आहे. यामध्ये पाणी किती आम्लयुक्त किंवा अल्कधर्मी आहे, मल कोलायटिस, बायोकेमिकल ऑक्सिजन मागणी, रासायनिक ऑक्सिजन मागणी आणि विरघळलेला ऑक्सिजन यांचा समावेश आहे. या सहा पॅरामीटर्सवर ज्या ठिकाणांहून नमुने घेण्यात आले त्यापैकी बहुतेक ठिकाणी, विष्ठेतील कोलिफॉर्म बॅक्टेरियाचे प्रमाण प्रमाणापेक्षा जास्त आढळून आले. याशिवाय, पाण्याची गुणवत्ता इतर ५ पॅरामीटर्सच्या मानकांनुसार आहे. जिल्ह्यातील सर्व नमुना तपासणी केंद्रांवर विष्ठेतील कोलिफॉर्म बॅक्टेरिया निर्धारित मानकांपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

## राम मंदिरावरून उडणारे ड्रोन पाडले

■ वृत्तसंस्था, अयोध्या, दि. १८ :
अयोध्येतील राम मंदिर संकुलात गदीर्तून उडणारे ड्रोन पाडण्यात आले आहे. सोमवारी संध्याकाळी गेट क्रमांक ३ वर ड्रोन उडत पोहोचला. त्यावेळी रामलल्लाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ड्रोनविरोधी यंत्रणेने ड्रोन पाडला. यानंतर सुरक्षा कर्मचारी सतर्क झाले. बॉम्ब स्क्वॉड टीमला पाचारण करण्यात आले. ड्रोनची तपासणी करण्यात आली. ड्रोन कॅमेरा उडवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेतला जात आहे.

अयोध्या पोलिसांना संशय आहे की हे चेंगराचेंगरी घडवण्याचे कट असू शकतो. कारण, राम मंदिर परिसरात ड्रोन उडवण्यास मनाई आहे. मंदिरावरून विमानांनाही उड्डाण करण्याची परवानगी नाही.

अयोध्येतील कटरा चौकीचे प्रभारी सुनील कुमार यांनी रामजन्मभूमी पोलिस ठाण्यात या प्रकरणी एफआयआर दाखल केला आहे. मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहता ड्रोन उडवण्यात आल्याचा संशय आहे. जेणेकरून मंदिर परिसरात चेंगराचेंगरी होऊ शकते आणि जीवितहानी होऊ शकते. महाकुंभामुळे यावेळी मोठ्या संख्येने भाविक अयोध्येत पोहोचत आहेत. ड्रोनविरोधी यंत्रणा २.५ किमीच्या परिघात उडणारे ड्रोन पाडते.

## महायुतीत कोल्ड वॉर नाही

**शिंदेंचा खुलासा**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
महायुतीमध्ये सर्वकाही आलबेल नसल्याची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे समांतर सरकार चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी नवीन वॉर रूम सुरू केली, असे बोलले जात आहे.



या सर्व विषयांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महायुतीमध्ये कोणतेही कोल्ड वॉर सुरू नसल्याचे त्यांनी स्पष्ट करत महाराष्ट्र विकास विरोधी लोकांशी वॉर सुरू असल्याची टीका विरोधकांवर केली आहे. ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वॉर रूमबाबत विचारले असता, राज्यातील महत्वाच्या पायाभूत सेवा प्रकल्पांचा आढावा घेणारी एकच वॉर रुम आहे. नवीन वॉर रुम उघडली नाही. शिवसेनेच्या मंत्र्यांकडील खात्यांचा आढावा घेण्यासाठी समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. हा कक्ष वॉर रुमशी संलग्न आहे. त्यामुळे महायुतीत कोल्ड वॉर नाही तर महाराष्ट्र विकास विरोधी लोकांशी वॉर आहे, असे त्यांनी सांगितले.

## बांगलादेशात ५ महिन्यांत
# ३२ हिंदूंची हत्या




■ वृत्तसंस्था, ढाका, दि. १८ :
बांगलादेश हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन युनिटी कौन्सिलच्या अहवालानुसार, बांगलादेशमध्ये जातीय हिंसाचारात 32 हिंदू मारले गेले. या घटना ४ ऑगस्ट २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ दरम्यान घडल्या. महिलांवर बलात्कार आणि छळाच्या १३ घटना घडल्या. मंदिरांवर हल्ल्यांच्या १३३ घटनांची नोंद झाली.

परिषदेच्या मते, सत्तापालटानंतर अवघ्या १५ दिवसांत अल्पसंख्याकांविरुद्ध जातीय हिंसाचाराच्या एकूण २०१० घटना घडल्या. ११ जानेवारी २०२५ रोजी, बांगलादेशच्या मुख्य सल्लागार कार्यालयाने अहवाल दिला की २०१० पैकी १७६९ प्रकरणांची पुष्टी झाली. यापैकी १,४१५ प्रकरणांमध्ये तपास पूर्ण झाला आहे. ३५४ प्रकरणांची तपासणी सुरू आहे. हा अहवाल बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन युनिटी कौन्सिलने तयार केला आहे. ते घडवण्यात परिषदेचे सरचिटणीस मुनिंद्र कुमार नाथ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ते म्हणतात, 'बांगलादेशातील सत्तापालटादरम्यान ४ ऑगस्ट ते ८ ऑगस्टदरम्यान अल्पसंख्याकांवर मोठ्या प्रमाणात हल्ले झाले. आम्ही त्यांचा डेटा दोन भागात तयार केला आहे. बांगलादेशमध्ये दीर्घ विद्यार्थी आंदोलनानंतर शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकण्यात आले. हसीना यांना देश सोडून पळून जावे लागले. यामुळे बांगलादेशातील परिस्थितीही बिकट झाली. येथे हिंदू समुदायावर हल्ले वाढले आहेत.

## कारची ट्रेलरला तर डंपरची वाहनाला धडक

■ वृत्तसंस्था, दौसा, दि. १८ :
राजस्थानातील दौसा येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. महाकुंभ मेळ्यावरून परतणाऱ्या प्रवाशांची गाडी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरला मागून धडकली.

मंगळवारी सकाळी ११ वाजता दौसा शहराच्या बायपासवर हा अपघात झाला. गाडीत ६ जण होते. गाडीत अडकलेले पाच मृतदेह बाहेर काढण्यासाठी सुमारे एक तास लागला. तीन



जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. गाडीचे काही भाग तोडून मृतदेह बाहेर काढण्यात आला. कारमधील सर्व प्रवासी टोंकमधील देवली येथील रहिवासी आहेत.

किस्तुर चंद यांचा मुलगा मुकुट बिहारी, मुकुट बिहारी यांची पत्नी गुड्डी देवी, राकेश सोनी यांची पत्नी निधी, किशनलाल यांचा मुलगा राकेश आणि नफीस यांचा अपघातात मृत्यू झाला. कार चालक दीपेश परवानी, ट्रक चालक धरमवीर, रामचरण जखमी झाले आहेत.

## १० ठार

भिंडच्या जवाहरपुरा गावाजवळ, एका वेगवान डंपरने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका मालवाहू वाहनाला धडक दिली. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. २० जण जखमी आहेत. मंगळवारी पहाटे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७१९ वर हा अपघात झाला. अपघातातील सर्व बळी जवाहरपुरा गावातील लग्न समारंभातून त्यांच्या गावी भवानीपुरा येथे परतत होते. सगळे नातेवाईक आहेत. डंपर चालक घटनास्थळावरून पळून गेला. अपघातानंतर ग्रामस्थांनी रस्ता रोखून आंदोलन केले.

## चॅम्पियन्स ट्रॉफीला आजपासून सुरुवात



**भारताचे गोलंदाजी कोच मॉर्केल दुबईहून दक्षिण आफ्रिकेला परतले**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
बुधवारपासून पाकिस्तान आणि युएईमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीला सुरुवात होत आहे. त्याआधीही टीम इंडियाचे गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल दुबईहून त्यांच्या देश दक्षिण आफ्रिकेत परतले आहेत. मॉर्ने मॉर्केलच्या वडिलांचे निधन झाल्याची माहिती पुढे आली आहे. तत्पूर्वी, मॉर्न मॉर्केल शनिवारी संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे पोहोचला. दरम्यान, सोमवारी भारतीय संघाच्या सराव सत्रात मोर्ने मॉर्केल उपस्थित नव्हता. मॉर्केल संघात कधी सामील होईल? याबद्दल बीसीसीआयकडून माहिती देण्यात आलेली नाही.

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपला पहिला सामना २० फेब्रुवारी रोजी दुबईत बांगलादेशविरुद्ध खेळणार आहे. संघाचा दुसरा सामना २३ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानविरुद्ध आणि तिसरा सामना २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध असेल. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाच्या संघात रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), ऋषभ पंत (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांचा समावेश आहे.

## ज्ञानेश कुमार नवे मुख्य निवडणूक आयुक्त

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १८ :
१९८८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आणि विद्यमान निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची नवीन मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आज निवृत्त होत आहेत. नवीन कायद्यांतर्गत नियुक्त झालेले ते पहिले सीईसी आहेत. त्यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९ पर्यंत राहील.

सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत ही नियुक्ती करण्यात आली. गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बैठकीला उपस्थित होते. या पॅनेलच्या शिफारशीवरून नवीन सीईसीची नियुक्ती करण्यात आली.

बैठकीत विवेक जोशी यांची निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते हरियाणाचे मुख्य सचिव आणि १९८९ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्याच वेळी, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू हे त्यांच्या पदावर राहतील.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, नवीन सीईसीसाठी ५ नावांची यादी देण्यात आली होती. पण राहुल यांनी नावांचा विचार करण्यास नकार दिला होता.

बैठकीनंतर राहुल गांधी यांनी एक असहमती पत्र जारी केले होते. यामध्ये त्यांनी म्हटले होते की, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, त्यामुळे ही बैठक होऊ नये. त्याच वेळी, काँग्रेसने म्हटले होते, आम्ही अहंकाराने काम करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाला लवकर निर्णय घेता यावा म्हणून बैठक पुढे ढकलावी लागली. सिंघवी म्हणाले, सरकारने सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होईपर्यंत वाट पाहायला हवी.


जाणता राजा
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-

श्री. एम. जी. भुरे, प्राचार्य, छ. शि. हाय. देवरी
श्री. जी. एम. काशिवार, मुख्याध्यापक, छ. शि. प्रा.वि. मंदिर देवरी
श्री. वाय. सी. दुधनाग, प्राचार्य, छत्रपती शिवाजी डी. एल.एड. कॉलेज देवरी
तथा सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद.
संकलन - नंदूप्रसाद शर्मा तालुका बातमीदार देवरी - 9423416066

# रवींद्र नाट्यमंदिर आणि पु.ल. देशपांडे कला अकादमी नव्या रूपात

## २८ फेब्रुवारीला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १८ :

मुंबईच्या मध्यवर्ती भागात असलेले रवींद्र नाट्यमंदिर आणि पु. ल. देशपांडे कला अकादमी नव्या स्वरूपात २८ फेब्रुवारी २०२५ पासून नाट्यरसिक आणि कलाप्रेमींच्या सेवेत दाखल होत आहे. या अत्याधुनिक संकुलाच्या उद्घाटन सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार अनिल देसाई, आमदार महेश सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

हा भव्य उद्घाटन सोहळा संध्याकाळी ६ वाजता पार पडणार असून, यासाठी सर्व मुंबईकरांना उपस्थित राहण्याचे विशेष आमंत्रण सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले आहे.

या उद्घाटन सोहळ्याच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर, आज मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव व सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उपसचिव नंदा राऊत, तसेच अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर उपस्थित होते.




नवीन बोधचिन्ह लोककला, अभिजात कला, दृश्यात्मक कला आणि दृकश्राव्य कला अशा सर्व कलांचे प्रतिबिंब दर्शवणारे आहे. हे बोधचिन्ह अकादमीच्या नवनिर्मित संकल्पनेचे प्रतीक असून, कलाक्षेत्राच्या विविध अंगांचा योग्य तो समन्वय साधते, असे मंत्री ॲड. शेलार यांनी यावेळी सांगितले.

मंत्री ॲड. शेलार यांनी नमूद केले की, पु.ल. देशपांडे कला अकादमीने स्थापनेपासून अनेक कलाकार आणि कलाप्रेमी घडवले आहेत. ही संस्था नवोदित आणि कसलेल्या कलाकारांसाठी एक हक्काचे व्यासपीठ ठरणार आहे.

"कलाक्षेत्रात शिक्षण, सादरीकरण, संवर्धन आणि रोजगार निर्मिती या सर्व गरजा एकाच ठिकाणी पूर्ण करणारी ही अकादमी आता अत्याधुनिक स्वरूपात उपलब्ध होणार आहे," असे सांगून त्यांनी पुढील महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट केले.

२० वेगवेगळे प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम लवकरच सुरू होणार. नवोदित कलाकारांना विशेष संधी उपलब्ध होणार. कलाक्षेत्राच्या प्रत्येक अंगाची वाढ होईल, यासाठी विशेष सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

रवींद्र नाट्यमंदिर आणि पु. ल. देशपांडे कला अकादमी संकुलामध्ये 2 लघु नाट्यगृहे,5 प्रदर्शन दालने, 15 तालीम दालने या सुविधा उपलब्ध आहेत. "नाट्य, संगीत, चित्रपट आणि विविध कला सादरीकरणासाठी येथे आधुनिक तंत्रज्ञानासह सुविधा उभारण्यात आल्या आहेत," असेही मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

नाटक आणि मराठी चित्रपट यासाठी आवश्यक असणाऱ्या अत्याधुनिक ध्वनी प्रणाली आणि अंतर्गत सजावटीवर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे हे संकुल कलाकार, तंत्रज्ञ आणि कलाप्रेमींसाठी एक उत्तम स्थान ठरणार आहे.

मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिर आणि पु. ल. देशपांडे कला अकादमी यांचे नव्याने सुरू होणे ही संपूर्ण कलाक्षेत्रासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. २८ फेब्रुवारीच्या उद्घाटन सोहळ्यासाठी सर्व मुंबईकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे १९ फेब्रुवारीला कुंभमेळ्यात सहभागी होणार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १८ :



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे येत्या १९ फेब्रुवारी रोजी प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात सहभागी होणार असून, आपल्या पक्षातील सर्व आमदार, खासदार आणि मंत्र्यांसह कुंभस्नान करणार आहेत. हिंदू धमार्तील सर्वात महत्त्वाच्या धार्मिक सोहळ्यांपैकी एक असलेल्या कुंभमेळ्यात सहभागी होताना, शिंदे हे हिंदुत्वाच्या मुद्यावरून शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांना शह देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे.

उद्धव ठाकरे यांच्यावर राजकीय विरोधकांकडून सातत्याने हिंदुत्व सोडल्याचा आरोप केला जातो. अशा पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री शिंदे हे आपल्या आमदार, खासदारांसह कुंभस्नान करणार असल्याने, त्याचा राजकीय संदर्भ जोडला जात आहे. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर प्रमुख नेत्यांनी देखील कुंभमेळ्यात स्नान केले आहे. शिंदे यांच्या या उपस्थितीमुळे पक्षाच्या ताकदीचेही प्रदर्शन होणार असल्याचे सांगितले जात आहे.

महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा अधूनमधून होत असतात. महत्त्वाच्या बैठकींना त्यांच्या अनुपस्थितीमुळे या चर्चांना अधिक जोर येतो. दुसरीकडे, शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना सातत्याने राजकीय धक्के देण्याचे धोरण कायम ठेवले आहे. नुकतेच माजी आमदार राजन साळवी यांनी शिंदे गटात प्रवेश केला. आता ठाकरे गटाचे विलेपार्ले उपविभागप्रमुख जितेंद्र जनावळे यांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) च्या काही आमदारांच्या सुरक्षेत कपात करण्यात आल्याने नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. यापूर्वी महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर शिंदे गटाच्या आमदारांना वाय प्लस सुरक्षा देण्यात आली होती. मात्र, आता त्यात कपात करत वाय स्तरावर आणण्यात आले आहे. त्यामुळे हे आमदार नाराज झाले असून, त्यांनी ही बाब उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कानावर घातल्याची माहिती मिळाली आहे.

या सुरक्षेसंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करण्याची शक्यता आहे. सुरक्षा कपातीमुळे नाराज आमदारांची समजूत कशी काढली जाते आणि शिंदे यांचा पुढील राजकीय डाव काय असेल, याकडे सध्या सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# मनोज जरांगेंनी घेतली होती वाल्मीक कराडची भेट

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १८ :



भाजप आमदार सुरेश धस व सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी वादात सापडलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांच्या भेटीमुळे अवघ्या राज्याचे राजकारण तापले आहे. त्यात आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी वाल्मीक कराडची भेट घेतल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली आहे. धस यांनी ज्या अथार्ने धनंजय मुंडे यांची भेट घेतली, त्याच अर्थाने जरांगेंनी कराडची भेट घेतली. त्यामुळे मी या भेटीकडे वेगळ्या भावनेने पाहत नाही, असे ते म्हणालेत.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेत. भाजप आमदार सुरेश धस यांनी यासंबंधी त्यांच्यावर 'आकाचे आका' म्हणत टीकेची झोड उठवली होती. तसेच त्यांचा राजीनामाही मागितला होता. पण आता त्यांनीच धनंजय मुंडे यांची भेट घेऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.

या प्रकरणी त्यांच्यावर चौफेर टीका होत आहे. पण लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांना त्यांनी काही महिन्यांपूर्वी वाल्मीक कराडची भेट घेतल्याची आठवण करून दिली आहे.

लक्ष्मण हाके पुण्यात पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील व वाल्मीक कराड यांची 5 महिन्यांपूर्वी पहाटे - पहाटे भेट झाली होती. त्यांची भेट ज्या अर्थाने झाली होती, त्याच अर्थाने भाजप आमदार सुरेश धस व मंत्री धनंजय मुंडे यांची भेट झाली असावी. या दोन्ही भेटींकडे मी वेगळ्या भावनेने पाहत नाही. पण जरांगे या प्रकरणी धस यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत असतील, तर जरांगे यांनाही त्याच पिंजऱ्यात उभे करावे लागले.

# लाकूड, कोळशावरील भट्टया स्वच्छ इंधनावर चालविण्यासाठी ८ जुलैची मुदत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १८ :

लाकूड किंवा कोळसा जाळून त्यावर चालणाऱ्या बेकरी व उपाहारगृहातील तंदूर भट्टया आता लवकरच बंद कराव्या लागणार आहेत. पाव, लादीपाव यासारख्या पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या भट्टया (बेकरी), हॉटेल, उपाहारगृहे, उघड्यावर अन्न पदार्थ तंदूर करणारे व्यावसायिक यांना पयार्यी स्वच्छ इंधनाचा अवलंब करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार, मुंबई महापालिकेने या सर्व व्यावसायिकांना आता ८ जुलैची मुदत दिली आहे. अन्यथा, कठोर कारवाईचा इशाराही पालिका प्रशासनाने दिला आहे.

वायुप्रदूषणासाठी बांधकामे आणि प्रकल्पांमधून निर्माण होणारी धूळ व तत्सम घटक कारणीभूत ठरतात.

त्याचप्रमाणे, लाकूड व कोळसा याचा इंधन म्हणून उपयोग करणाऱ्या भट्टया (बेकरी), हॉटेल, उपाहारगृहे आणि उघड्यावर खाद्यापदार्थ विकणारे व्यवसायदेखील वायुप्रदूषणास कारणीभूत ठरतात. यासंदर्भात उच्च न्यायालयाने ९ जानेवारी रोजी घेतलेल्या सुनावणीत सहा महिन्यांच्या मुदतीत लाकूड व कोळसा इंधन आधारित व्यावसायिकांनी पर्यायी स्वच्छ इंधनाचा अवलंब करण्याचे आदेश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासनाने या सर्व व्यावसायिकांना ८ जुलै २०२५ ची मुदत दिली आहे. तसेच, हरित व स्वच्छ इंधनाचा अवलंब न करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश प्रदूषण नियंत्रण मंडळ व पालिकेला दिले.

लाकूड व कोळसा याचा इंधन म्हणून उपयोग करणाऱ्या भट्टया (बेकरी), हॉटेल, उपाहारगृहे व उघड्यावर खाद्यापदार्थ विकणारे व्यवसाय प्रदूषणास कारणीभूत ठरतात.

# एटीएम कार्ड बदलून २१ ज्येष्ठांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १८ :

पुणे पोलिसांनी एटीएम कार्ड बदलून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. कर्नाटकमधील म्हैसूर येथील राजू प्रल्हाद कुलकर्णी (५४) असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून १३ लाख ९० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल आणि १६६ एटीएम काड्‌र्स जप्त करण्यात आली आहेत. आरोपी पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील एटीएम सेंटर्स वर ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करत असे. पैसे काढण्यास अडचण येणाऱ्या वृद्धांना मदतीचे आमिष दाखवून त्यांचे एटीएम कार्ड आणि पिन नंबर मिळवत असे. त्यानंतर हात चलाखीने त्यांचे मूळ कार्ड बदलून दुसरे कार्ड देत असे. पिन नंबर मॅच होत नसल्याचे सांगून बँकेत जाण्यास सांगत असे आणि मूळ काडार्चा वापर करून पैसे काढत असे. २ फेब्रुवारीला बँक ऑफ महाराष्ट्राच्या शास्त्री रोड, नवी पेठ येथील एटीएम मध्ये अशाच प्रकारे २२ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

# डॅमेज कंट्रोलसाठी उद्धव ठाकरे सरसावले

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १८ :

शिवसेनेतील (ठाकरे गट) गळती रोखण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर, २० फेब्रुवारीला खासदारांची आणि २५ फेब्रुवारीला आमदारांची बैठका मातोश्री निवासस्थानी बोलावली आहे. या बैठकीत पक्षातील कमकुवत बाबींचा आणि आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर गटनेते पदाबाबत चर्चा केली जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

शिवसेनेतील एकनिष्ठ कार्यकर्त्यांनी पक्ष सोडल्याने उद्धव ठाकरे यांचे टेंशन वाढले आहे. राजकीय वतुर्ळात जोरदार चर्चा सुरु आहे की काही खासदार देखील पक्ष सोडणार आहेत. नुकतेच लांजा-राजापूर विधानसभा मतदार संघातील शिवसैनिक राजन साळवी यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करत शिवसेनेत प्रवेश केला, आणि त्यानंतर सुभाष बनेसह अनेक नेत्यांनीही पक्षात प्रवेश केला.

शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या कोकण मध्ये ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. यापूर्वी, शिवसेनेची रणरागिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी नगरसेविका राजूल पटेल यांनी पक्ष सोडला. या पार्श्वभूमीवर मिशन टायगर राबवून शिवसेनेकडून पक्षाचे खालसा करण्यासाठी हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. माजी आमदार वैभव नाईक लवकरच शिवसेनेत प्रवेश करतील, असा दावा केला जात आहे.

कोकणातील शिवसेनेचे एकमेव आमदार भास्कर जाधव यांना गळाला लावण्याच्या हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहेत. आता पक्ष सोडणार असलेल्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांकडून वाढलेली गळती रोखण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी खासदार व आमदारांची बैठक बोलावली आहे. या बैठकीमध्ये, पक्षात नेमकं काय सुरु आहे आणि खासदार व आमदारांच्या मनातील विचार काय आहेत, याची सखोल चर्चा केली जाईल.

मातोश्रीवर दररोज बैठका आयोजित करण्यात येतात, ज्यामध्ये प्रत्येक तालुक्यातील पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला जातो. यामध्ये पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची उपस्थिती असते. येत्या २० आणि २५ फेब्रुवारीला देखील अशाच प्रकारच्या बैठकांचा आयोजन होणार आहे, अशी माहिती शिवसेना नेते विनायक राऊत यांनी दिली. माजी आमदार वैभव नाईक यांनी सोमवारी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान, दोघांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. नाईक यांनी शिवसेना सोडण्याचा विचार असलेला काहीही इशारा नाकारला.

# नवी मुंबई मनपातील कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार : आकाश फुंडकर

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १८ :



नवी मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न लवकरच सोडवला जाणार आहे. यासाठी महानगरपालिका आयुक्तांना मार्गदर्शन करून योग्य तो निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे कामगार मंत्री आकाश पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिकेतील ८००० कंत्राटी सफाई कामगार आणि १००८ ठोक मानधन रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनाबाबत आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस माजी खासदार व श्रमिक संघटनेचे अध्यक्ष संजीव नाईक, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, कामगार विभागाचे अधिकारी आणि विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कामगारांच्या वेतनासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावर एक विशेष समिती गठित करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल लवकरच महानगरपालिकेकडे सादर केला जाणार असून, त्यानंतर कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावला जाईल, असे मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले.

कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न हा प्रत्येक महानगरपालिका आणि नगरपालिका आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतो. त्यामुळे महानगरपालिका आयुक्तांनी कामगारांच्या वेतन प्रश्नाकडे सहानुभूतीने पाहावे आणि त्वरित तोडगा काढावा, असेही मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले. कामगारांचे वेतन नियमित व वेळेवर मिळावे, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले. आता समितीचा अहवाल आल्यानंतर महानगरपालिका प्रशासन कोणते ठोस पाऊल उचलते, याकडे कंत्राटी कामगारांचे लक्ष लागले आहे.

## सुरक्षा कपातीमुळे शिवसेना नेत्यांमध्ये नाराजी

**मुंबई :** राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार काही नेत्यांची सुरक्षा कमी करण्यात आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील अनेक नेते नाराज झाले आहेत. प्रशासनाने ज्यांच्या जीवाला धोका नाही, अशा नेत्यांची सुरक्षा कमी करण्याचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही मंत्र्यांसह महत्त्वाच्या नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत कपात करण्यात आली आहे. काहींची सुरक्षा श्रेणी कमी करण्यात आली असून काहींच्या अंगरक्षकांची संख्या कमी केली गेली आहे. मात्र, शिवसेनेतील काही नेत्यांना अजूनही संभाव्य धोका असल्याचा दावा करत, त्यांची सुरक्षा पूर्ववत ठेवण्याची मागणी करण्यात येत आहे.

# जपानमध्ये उभारणार महाराष्ट्राचा अभिमान

## टोकियोत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १८ :



पुण्यात 'आम्ही पुणेकर' संस्थेच्या वतीने एका नेत्रदीपक सोहळ्यात जपानच्या टोकियो शहरात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन आणि शिव स्वराज्य यात्रेचा समारोप पार पडला. गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या या कार्यक्रमात भारतातील १३ राज्यांमधून सुमारे ८ हजार किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या शिव स्वराज्य यात्रेचा समारोप करण्यात आला.

कार्यक्रमात पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली, ज्यात रॉयल एनफिल्डवर स्वार बाईकर्सनी शिवरायांना मानवंदना दिली. महिलांनी शेकडो दिव्यांनी शिवरायांची आरती केली आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

एमआयटी ग्रुपचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांनी शिवरायांना जगातील सर्वश्रेष्ठ राजा म्हटले. भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी शिवरायांना राष्ट्रपुरुष म्हणून संबोधले. इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी शिवरायांच्या कार्याला जागतिक महत्त्व असल्याचे सांगितले.

'आम्ही पुणेकर'चे अध्यक्ष हेमंत जाधव यांनी सांगितले की, २०२३ मध्ये कुपवाडा येथे सैनिकांसाठी उभारलेल्या स्मारकाप्रमाणेच टोकियोतील हे स्मारक लोकवर्गणीतून साकारले जात आहे. जपानमधील इडीगोवा इंडियन कल्चरल सेंटरचे विश्वस्त योगेंद्र पुराणिक यांनीही व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कार्यक्रमात सहभाग घेतला.

याशिवाय शाहू लक्ष्मी कला क्रीडा अकादमी यांनी शिवकालीन युद्ध कला सादरीकरण, राम देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे चित्र रेखाटन केले. भक्ती गुरुकुल भजनी मंडळाच्या वतीने भजन सादर करण्यात आले. केशव शंखनाद पथकाने शंखवादन केले तर ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. संतोष रासकर यांनी सूत्रसंचालन केले. उत्तम मांढरे यांनी आभार मानले.

# स्वराज्यरक्षक-छत्रपती शिवबा



**शि**वाजी शहाजी भोसले छत्रपती शिवाजी महाराज म्हणून प्रसिद्ध, हे एक भारतीय राजे आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे एक दैवी चमत्कार होता. त्यांची आई जिजाबाई ही लखुजी जाधवराव या निजामशाहीतील शुरसरदाराची मुलगी तर वडील शहाजीराजे भोसले हे स्वकर्तृत्वाने सामर्थ्यवान असलेल्या मालोजीराव भोसले यांचे चिरंजीव. राजकारणात मुरलेल्या व आनंदाचा उन्मेश बाळगणाऱ्या माता-पित्यांच्या पोटी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म 19 फेब्रुवारी 1630 यावर्षी वैशाख शुध्द द्वितीय पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहराजवळील शिवनेरी या डोंगरी किल्यावर झाला. त्यामुळे शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातल्याच नाहीतर अखिल भारतातल्या प्रत्येकाचे स्फुतीर्दायी दैवत आहे. इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा मतभेदांचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके 1551 (शुक्रवार, 19 फेब्रुवारी 1630) ही शिवरायांची जन्मतारीख 2001 साली स्वीकारली. तेव्हापासुन महाराष्ट्र शासनाने शिवाजी महाराजांच्या जन्माच्या (शिवाजी जयंती) स्मरणार्थ 19 फेब्रुवारी हा दिवस सुट्टी म्हणून सूचीबद्ध केली आहे. इतर संभाव्य तारखांमध्ये 6 एप्रिल 1627 (वैशाख शुद्ध तृतीया) ही एक जन्मतारीख मानली जात होती.


शिवाजी महाराजांचे नाव शिवाई या देवतेवरून ठेवण्यात आले. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजाबाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा अशी प्रार्थना केली होती म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. शिवरायांचे वडील शहाजीराजे भोंसले हे मराठा सेनापती होते, ज्यांनी दख्खनच्या सल्तनतची सेवा केली होती. त्यांच्या आई जिजाबाई होत्या, ज्या सिंदखेडच्या लखुजी जाधवरावांच्या कन्या होत्या. जाधव हे देवगिरीच्या यादव राजघराण्यातील वंशाचे होते. छ.शिवाजी महाराज हे मराठा जातीतील आणि भोसले कुळातील होते. त्यांचे आजोबा मालोजी अहमदनगर सल्तनतचे एक प्रभावशाली सेनापती होते आणि त्यांना राजा ही उपाधी देण्यात आली होती. लष्करी खर्चासाठी त्यांना पुणे, सुपे, चाकण आणि इंदापूरचे देशमुखी हक्क देण्यात आले होते. त्यांना त्यांच्या कुटुंबाच्या वास्तव्यासाठी किल्ला शिवनेरी देखील देण्यात आला होता.

शिवाजीला लढाईचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण दादोजी कोंडदेव यांनी दिले. दहा-बारा वर्षाचे असतानाच शिवाजींच्या मनात स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले. माझा देश मोगलांच्या आणि मुसलमानांच्या गुलामीतून मुक्त करायचा, माज्या बांधवांना गुलामीतून आणि छळातून सोडवायचे. शिवाजींनी सूद्रीच्या कडेकपारीत भटकून सवंगडी गोळा केले. तानाजी, नेताजी, सूर्याजी, बाजी, वेसाजी असे एका पेक्षा एक जिवाला जीव देणारे मित्र गोळा केले. श्री रोहिडेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली आणि एका स्वरात घोषणा दिली. ह्यहर हर महादेव महाराष्ट्रातल्या मावळखोऱ्या पासुन त्यांनी आपल्या लढयाला आरंभ केला. साम-दंड-भेदांचा उपयोग करत अवघ्या चौदाव्या वर्षी शिवाजींनी तोरणागड जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. मग त्यांनी मागे वळुन पाहिलेच नाही एका मागून एक गड आणि किल्ले जिंकून घेतले.

त्यांनी पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जाण्यासही प्रेरणा मिळावी असे आपले चरित्र घडविले आणि एक मोठा आदर्श निर्माण केला कोणत्याही कार्याचा आरंभ लहानशा मर्यादित होतो आणि पुढे ते कार्य मोठया मयार्देत गेलेले आढळते. पवित्रगंगेचा उगम आणि पुढे तिचा झालेला विस्तार हे उदाहरण या दृष्टिने लक्षात घेण्या सारखे नाही कां? तर शिवाजी महाराजांचे कार्य जरी आरंभी महाराष्ट्राच्या विविध विषयाचा विरोध प्रकट करुन स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नापुरता मर्यादित असला तरी लोकांच्या मनात जी स्वातंत्र्य प्रेमाची ज्योत पेटली त्यामुळे पुढे भारतात दक्षिणोत्तर ती प्रेरणा निर्माण झाली.

स्वदेश स्वतंत्र व्हावा ही माता-पित्यांची इच्छा शिवाजीने पूर्ण केली. हिंदु धर्माचा पाडाव करुन सर्व हिंदुस्थान मुसलमानमय करुन टाकावाया महत्वाकांक्षेने झपाटलेला औरंगजेब हा दिल्लीच्या तख्तावर होता. शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन इस्लामी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवलकोंडयाची कुतुबशाही अशा वेढयात सापडलेला पूणे-सुपे परिसर या तिन्ही मुस्लिम राज्यांवर औरंगजेबाची हुकूमत होती. माता जिजाऊंनी शिवाजीराजांच्या मनात या अन्यायकारी वृत्ती विषयाचा विरोध आणि बीज निर्माण करुन स्वांतत्र्य आणि स्वराज्य या विषयींच्या निष्ठा निर्माण केल्या. शिवाजीराजांच्या अंगभूत गुणांचा विकास केला आणि हळूहळू शिवाजीराजे त्या दिशेने प्रयत्न करु लागले. मराठी माणसांच्या मनातल्या रागाला नेमकी दिशा दाखविण्यासाठी त्यांनी मराठा तितुका मेळवावा हे सुत्र धरुन स्वातंत्र्यप्रेमी, पराक्रमी आणि निष्ठावान माणसांना एकत्र केले.

यावेळी त्यांच्या लक्षात आले की, काही स्वार्थी मराठी माणसे सरदारकी, जहागिरी आणि मोठया हुद्यासाठी परक्या सत्ताधिशांच्या चाकरीत धन्यता मानून शिवाजीराजांच्या स्वातंत्र्य लढयाला विरोध करत होते. लोकांनी शिवाजी महाराजांना राज्यभिषेक करवून घेण्याचा आग्रह केला. महाराजांनी आपल्या मातेशी आणि जवळच्या सरदारांशी चर्चा करुन राज्यभिषेक करवून घ्यायचा असे ठरवले. काशीचे प्रसिध्द पंडीत गागाभट्ट धार्मिक विधी करण्यासाठी आले. स्वराज्याची राजधानी रायगड ठरली. शिवाजी राजा सिंहासनावर बसला. लोकांनी जयजयकार केला, छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय' शिवाजी महाराजांनी आपले जीवन देव, देश आणि धर्म यासाठी वेचले. संत तुकाराम हे त्यांचे आध्यात्मिक गुरु होते तर संतरामदास हे त्यांचे राजकीय गुरु होते. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक 6 जून 1674 साली रायगडावर झाला. त्यानंतर थोडयाच काळात म्हणजे 6 वषानंतर 3 एप्रिल 1680 मध्ये शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. रामदासांनी त्यांचे गुणगौरव करतांना म्हटले, निश्चयाच्या महामेरु । बहुत जणासी आधारु ।। अखंड स्थितीच्या निर्धार। श्रीमंत योगी ।। इतिहासाच्या पानावर.. रयतेच्या मनावर.. मातीच्या कणावर- आणि विश्वासाच्या प्रमाणावर.. राज्य करणारा राजा म्हणजे, राजा शिवछत्रपतींच्या 396 व्या जयंती दिनानिमित्त मानाचा मुजरा.......



प्रविण बागडे
नागपूर.
९९२३६२०९१९
pravinbagde@gmail.com

महासागर
बुधवार, दि. 19 फेब्रुवारी 2025
अमरावती




# 'त्या' दोन्ही नर्सेसचे निलंबन मागे घ्या!

## आरएमओ कार्यालयापुढे परिचारिकांची निदर्शने

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - जिल्हा सामान्य रुग्णालय( इर्विन) येथील दोन अधिपरिचारिकांचे निलंबन करण्यात आले. या विरोधात मंगळवारी( दि.18 ) रुग्णालयातील अधिपरिचारिकांनी कामबंद आंदोलन केले. अचानक झालेल्या कामबंद आंदोलनामुळे रुग्णालय परिसरात तारांबळ उडाली होती. यावेळी प्रशासना विरोधात तीव्र नारेबाजी करत निषेध नोंदवला. निलंबन मागे घ्या, रुग्णालयात गुंडगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिस कारवाई करावी, या मुख्य मागण्या रेटून धरण्यात आल्या होत्या.

एका सहा वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करण्यात आला होता. तिला जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. मात्र ड्युटीवरील दोन अधिपरिचारिकांनी प्राथमिक उपचार करण्यास विलंब लावला असा आरोप करीत भिम ब्रिगेड संघटनेने आंदोलन केले होते. तसेच दोन्ही नर्सेसचे निलंबन करण्यात यावे. अशी मागणी रेटून धरली होती. तत्पूर्वी या प्रकरणात चौकशीही बसविण्यात आली. चौकशीच्या अहवालानुसार या दोन्ही नर्सेसचे निलंबन करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशनच्या नेतृत्वात इर्विन रुग्णालयातील संतप्त अधीपरिचारिकांनी याचा निषेध व्यक्त केला. तसेच परिसरात तीव्र निदर्शने करून कामबंद आंदोलनाला सुरुवात केली. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे रुग्णालय परिसरात तारांबळ उडाली होती. यावेळी आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन आंदोलक नर्सेसचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी डॉ. सौंदळे यांनी या संदर्भात आरोग्य विभागाचे उपसंचालक यांना पत्र व्यवहार करून न्याय देण्याचे आश्वासन दिले.

दोन दिवसांमध्ये यावर गांभीर्याने लक्ष देत दोन्ही नर्सेसचे निलंबन मागे घ्यावे. अन्यथा आगामी सोमवार पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा यावेळी सर्व नर्सेसने दिला आहे. यावेळी वर्षा पागोटे, मनिष कांबळे, हर्षा उमक, साधना भोरे, रितू बैस, दुर्गा घोडिले, बबिता बागडे, विद्या चुडे, सपना वाट, ज्योती तायडे, वैशाली नगराळे, ममता चव्हाण, प्रमिला कांबळे, शालिनी केवाडे, आकाश भालेराव, हरीश कातकर, आशा दाभाडे यांच्यासह अन्य नर्सेस सहभागी झाल्या होत्या.

# चेन स्नॅचिंग करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचे दोन सदस्य गजाआड

## 21 गुन्ह्यांचा छडा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )**- अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-2 ने मोठी कारवाई करत आंतरराज्यीय चेन (मंगळसुत्र) स्नॅचिंग करणाऱ्या टोळीतील दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत 21 जबरी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लागला असून आरोपींकडून 8 लाख रुपये किमतीचे 100 ग्रॅम सोने जप्त करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी



पत्रकार परिषदेत या घटनेची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 3 जानेवारी 2025 रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात एका नागरिकाने तक्रार दिली होती की, दोन दुचाकीस्वारांनी त्याची सोनसाखळी हिसकावून नेली. तक्रारीनंतर, गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू केला. यामध्ये हसन अली उर्फ आशु नियाझ अली (वय 21, रा. भुसावळ) आणि शेख जुबेर शेख निसार (रा. अमरावती) हे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

### शेख जुबेर ने पुरविली माहिती

तपासादरम्यान, हसन अलीने आपल्या साथीदारांसोबत अमरावती आणि इतर जिल्ह्यांत अनेक चैन स्नॅचिंगच्या घटना केल्याची कबुली दिली. शेख जुबेरने या टोळीला शहरातील ठिकाणांबद्दल माहिती पुरवली आणि त्यांना आश्रय दिला. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले की, या यशस्वी कारवाईसाठी पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने अतिशय प्रभावी कामगिरी केली. तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात आली आणि त्यांना अटक करण्यात आली. सध्या, टोळीतील इतर आरोपी फरार असून पोलिसांचा त्यांचा शोध सुरू आहे.

# ऐन घाटात एसटी चे स्टेअरींग फेल

## परतवाडा-तुकईथड बसमधील प्रवाशांच्या जीवाचा थरकाप

**परतवाडा,( दि.18 )** - परतवाडा आगाराच्या भंगार एसटी बसेस नेहमी प्रवाशांच्या जीवावर उठलेल्या पहायला मिळतात. मंगळवारी( दि.18 ) अशीच एक घटना समोर आली. ज्यामध्ये एमएच 40/6164 क्रमांकाची परतवाडा-तुकईथड बस चे बिहाली नजिक घाटात स्टेअरिंग फेल झाले. स्टेअरिंग काही झाले तरी फिरत नसल्याने एका प्रवाशांने मदत करुन चालकाला बस सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्यास मदत केली. या घटनेमुळे बसमधील प्रवाशांच्या जीवाचा थरकाप उडाला होता.



# गळफास घेऊन नवविवाहितेची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - पतीसोबत वाद झाल्यानंतर एका विवाहित महिलेने गळफास लावून आत्महत्या (दि.18) केली. वैशाली आकाश दंदे (27, राहणार लक्ष्मी नगर, यवतमाळ, हल्ली मुक्काम नांदुरा, पीएस वलगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. पतीसोबत वाद झाल्यानंतर वैशाली नांदुरा येथे आपल्या आई-वडिलांच्या घरी राहत होती. दरम्यान ती मानसिक तणावात होती. त्यामुळे तीने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. या घटनेच्या माहितीवरून वलगाव पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. वैशाली यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवगारात ठेवण्यात आला आहे.

# जय शिवाजी, जय भारत पदयात्रा आज

**अमरावती** - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 395व्या जयंतीनिमितत बुध्वार, दि. 19 फेबुवारी रोजी 'जय शिवाजी - जय भारत पदयात्रा'चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 7.30 वाजता सायन्सस्कोर मैदान येथून पदयात्रेला सुरवात होणार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सकाळी 7.30 वाजता देशाला संबोधीत करतील. त्यानंतर सकाळी 8 वाजता पदयात्रेला सुरवात होणार आहे. पदयात्रा सायन्सस्कोर मैदान, शिव टेकडी, जिजाऊ पुतळा, बियाणी चौक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पंचवटी चौकमार्गे निघून विभागीय क्रिडा संकुल येथे समारोप होणार आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय, धोतरखेडा. पं.स. अचलपूर जि. अमरावती.**

निविदा सूचना क्रं. ०१/दि.१७/०२/२०२५


**ग्राम पंचायत ईसापूर पं.स. अचलपूर जि. अमरावती. द्वारे विविध योजनेअंतर्गत खालील विकासात्मक कामे करीता बी-१ पध्दतीने निविदा नोंदणीकृत कंत्रांटदाराकडून मागविण्यात येत आहे. इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदारांनी आपली निविदा दिलेल्या मुदतीच्या आत सादर करावी .**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | अनामत रक्कम | योजनेचे नाव | सन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बंधिस्त नाली बांधकाम सहदेव डोंगरे ते सुनिल कोकदे | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| २ | बंधिस्त नाली बांधकाम राजु बेलोकर ते जयश्रीराम ठोसर | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ३ | बंधिस्त नाली बांधकाम रामदास बेठे ते सुंदरलाल चौधरी | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| ४ | बंधिस्त नाली बांधकाम बापूराव तायवाडे ते रामदास वरखडे | २ लक्ष रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| ५ | बंधिस्त नाली बांधकाम शेख शब्बीर ते मेन रोड | ५० हजार रुपये | ५० रुपये | ५०० रुपये | | |
| ६ | बंधिस्त नाली बांधकाम नरेंद्र खेरडे ते जयेश चर्जन | ८७ हजार ४२४ रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ७ | बंधिस्त नाली बांधकाम शिंगाडे ते शेख जहीर | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | १५ वित्त आयोग | २०२४-२५ |
| ८ | पाईप लाईन सार्वजनिक शौचालय पाईप लाईन धोतरखेडा | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ९ | पेव्हींग ब्लॉक बसविणे धोतरखेडा व येणी वार्ड क्र. २ व ४ मध्ये | १ लक्ष ८८ हजार १७३ रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| १० | ग्राम पंचायत कार्यालय ISO करणे दुरुस्ती इतर कामे | २ लक्ष २५ हजार रुपये | २५० रुपये | २५०० रुपये | | |
| ११ | पेव्हींग ब्लॉक बसविणे देविदास श्रीधर खेरडे ते देविदास लोंदे चौक | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| १२ | पेव्हींग ब्लॉक बसविणे येणी वार्ड आंगणवाडी समोर | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| १३ | नाली व रपटे बांधकाम नसीम बेग ते सुरेंद्र ढगे | २ लक्ष ३० हजार ५३८ | २५० रुपये | २५०० रुपये | | |
| १४ | नाली व रपटे बांधकाम स्वाती ठोंगे ते निलेश पटारे | १ लक्ष ६४ हजार ६६९ | १५० रुपये | १५०० रुपये | १५ वित्त आयोग | २०२४-२५ |
| १५ | स्मशानभूमी मध्ये बोअर व मोटरपंप साहित्य | २ लक्ष १२ हजार ४२४ रु. | २५० रुपये | २५०० रुपये | | |
| १६ | वार्ड क्रं. २ मध्ये सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम किसन मावस्कर पेव्हींग ब्लॉक वार्ड क्र. ३ नागोबा मंदिर ते अजिंक्य खेरडे बसविणे | ४ लक्ष ५० हजार रुपये | ४५० रुपये | ४५०० रुपये | | |
| १७ | सार्वजनिक व वैयक्तीक कचरा कुंडया खरेदी करणे | २ लक्ष रुपये | २०० रुपये | २००० रुपये | नागरी सुविधा विशेष अनुदान | २०२४-२५ |
| १८ | चर्जन ट्रेडर्स ते ओं कार काजे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | ३ लक्ष ५० हजार रुपये | ३५० रुपये | ३५०० रुपये | | |

**अटी व शर्ती,**

१. निविदा प्रसिध्द करणे. दि.१९/०२/२०२५
२. निविदा मिळणे व स्विकारणे, दि. २०/०२/२०२५ ते २६/०२/२०२५ पर्यंत
३. निविदा उघडणे, दि. २७/०२/२०२५ शक्यतो.
४. सर्व नियम व अटी ग्रा.प. नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.
५. निविदा दोन लिफाफा पध्दतीने पुर्ण भरलेली मुदतीच्या आत स्विकारल्या जाईल.
६. निविदा स्विकारणे किंवा रद्द करणे ग्रा.प. कार्यालय धोतरखेडा यांनी राखुन ठेवले आहे.

सरपंच / सचिव
ग्राम पंचायत धोतरखेडा




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# नवनीतच्या यूवातर्फे छत्रपती शिवाजी महाराज स्पेशल लाँग बुक सीरिजचे अनावरण

नागपूर, १८ फेब्रुवारी : यूवा या नवनीत एज्युकेशन हाऊसच्या भारतातील प्रमुख स्टेशनरी ब्रँडतर्फे छत्रपती शिवाजी महाराज लाँग बुक सीरिज लाँच करण्यात आली आहे. महान योद्धे छत्रपती शिवाजी महाराज यांना ही लिमिटेड एडिशन समर्पित करण्यात आलेली आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेली ही बुक्स, मराठा साम्राज्याच्या या महान नेतृत्वाच्या शौर्यकथा आणि समृद्ध इतिहास यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनपटाचे कलात्मक आणि ऐतिहासिक चित्रण दर्शवण्यासाठी या वह्या विचारपूर्वक डिझाइन करण्यात आल्या आहेत. या वह्यांच्या कव्हर्सवर महाराजांचे साहस, विवेकबुद्धी आणि दूरदृष्टी नेतृत्व हे गुण प्रतिबिंबित केले आहे, ज्यायोगे त्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण क्षण जिवंत होऊ शकतात. विद्यार्थ्यांना माहिती मिळावी आणि ते प्रेरित व्हावेत या उद्दिष्टाने वह्यांवर बारकाव्यांसह असलेली डिझाइन्स आणि आकर्षक चित्रे तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे ही बुक्स फक्त स्टेशनरी न राहता, इतिहासाला दिलेली मानवंदना ठरावीत.



शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, इतिहासप्रेमी आणि इतरांसाठी ही लाँग बुक्स म्हणजे कार्यक्षमता आणि प्रेरणेचा उत्तम मिलाफ आहेत. या वह्यांचा उपयोग अभ्यासाच्या नोट्स लिहिण्यासाठी किंवा वैयक्तिक भावना व्यक्त करण्यासाठी केला जाऊ शकतो. या वह्यांमुळे तरुणांना महाराजांच्या अजिंक्य वृत्तीपासून प्रेरणा मिळेल आणि रोजच्या जगण्यात महाराजांचा वारसा जिवंत राहील.

यूवाच्या यूवा स्टेशनरीचे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर श्री. अभिजीत सान्याल म्हणतात, छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या देशातील एक महान नेतृत्व होते आणि त्यांचा वारसा आपल्याला पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील. या स्पेशल एडिशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराजांची विवेकशीलता आणि शौर्य यांतून साहसातून प्रेरणा मिळेल, अशी आम्हाला आशा आहे. आमच्या खास पद्धतीने, रोजच्या शिक्षणात महाराजांची यशोगाथा जिवंत ठेवून उद्याचे नेतृत्व घडवण्याची आमची महत्त्वाकांक्षा आहे.

महाराष्ट्रातील आघाडीच्या स्टेशनरीच्या दुकानांमध्ये ही लाँग बुक्स उपलब्ध असून यांतून सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाची शिक्षणासोबत सांगड घालण्याचा यूवाची बांधिलकी दिसून येते, ज्यायोगे भारताच्या समृद्ध भूतकाळाशी तरुणांची नाळ जोडलेली राहील, हे सुनिश्चित होते.

# सॅमसंगकडून स्मार्ट कूलिंगला नव्या उंचीवर घेऊन जाणाऱ्या एआय वैशिष्ट्यांनी युक्त बीस्पोक एआय रेफ्रिजरेटर सिरीज लाँच

गुरूग्राम, १८ फेब्रुवारी : सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज ३३० लिटर व ३५० लिटर क्षमतेच्या श्रेणीमधील नवीन बीस्पोक एआय रेफ्रिजरेटर सिरीज लाँच केली. या नवीन श्रेणीमध्ये एआय एनर्जी मोड, एआय होम केअर व स्मार्ट फॉरवर्ड यांसारख्या प्रगत एआय-संचालित वैशिष्ट्यांसोबत आकर्षक डिझाइन्स आणि वैविध्यपूर्ण स्टोरेज पर्याय आहेत. भारतातील ग्राहकांच्या अद्वितीय गरजांची पूर्तता करण्याचा मनसुबा असलेली ही सिरीज कार्यक्षमता, स्टाइल आणि नाविन्यतेचे सुसंगत एकत्रिकरण देते.



नवीन बीस्पोक एआय रेफ्रिजरेटर्समध्ये स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट, सुधारित फ्रेशनेस रिटेशन आणि ॲक्टिव्ह फ्रेश फिल्टर आहे, जे जवळपास ९९.९ टक्के घातक जीवाणूंना दूर करते. ही सर्व वैशिष्ट्ये स्लीक व कस्टमायझेबल एक्स्टीरिअरमध्ये आहेत. टिकाऊ व ऊर्जा-कार्यक्षम डिजिटल इन्व्हर्टर कॉम्प्रेसर, २० वर्षांची वॉरंटी असलेली ही सिरीज भारतातील आधुनिक रेफ्रिजरेशनला नव्या उंचीवर घेऊन जाण्यास सज्ज आहे.

आमची बीस्पोक एआय रेफ्रिजरेटर सिरीज ग्राहकांना तंत्रज्ञान, डिझाइन व सोयीसुविधेचे परिपूर्ण संतुलन देते. एआय-सचांलित एनर्जी ऑप्टिमायझेशनपासून नाविन्यपूर्ण कूलिंग व हायजिन सोल्यूशन्सपर्यंत ही सिरीज भारतातील कुटुंबांच्या सर्वसमावशेक जीवनशैलीची पूर्तता करते. स्टायलिश फिनिशेस आणि स्मार्ट फॉरवर्ड, एआय होम केअर, ट्विन कूलिंग प्लस व कन्वर्टिबल ५-इन-१ मोड्स अशा वैशिष्ट्यांसह आमचा ग्राहकांना दैनंदिन राहणीमान परिभाषित करणाऱ्या अप्लायन्सेससह सक्षम करण्याचा मनसुबा आहे,'' असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेसचे वरिष्ठ संचालक गुफरान आलम म्हणाले.

# शतकातील सर्वात भव्य-दिव्य महाशिवरात्री सोहळा!

मुंबई, १८ फेब्रुवारी : आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक आणि ज्ञानाचे महासागर आचार्य उपेंद्रजी यांच्या अतुल्य अशा मार्गदर्शनाखाली अंतर योग फाउंडेशन २६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईत ऐतिहासिक अशा महाशिवरात्रीचे आयोजन करत आहे. २४ तास चालणाऱ्या या अध्यात्मिक महोत्सवात तब्बल ३ लाख भाविक सहभागी होणे अपेक्षित आहे. आरोग्य, प्रगती, भरभराट, ज्ञान, महिला सक्षमीकरण या विविध पैलूंभोवती या अनोख्या अशा सोहळ्याची भिस्त असेल. सामुहिक हीलिंग, वैद्यकीय तपासण्या, शक्तिशाली साधना, तत्काळ परिणाम अशी या अयोजानाची वैशिष्ट्ये आहेत. त्या माध्यमातून अर्थ, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील नेतृत्त्व उभे करण्यावर भर असेल आणि त्याचवेळी सक्षम नागरिक निर्माण व्हावेत, असेही या आयोजनाचे उद्दिष्ट असेल. महाशिवरात्री विनामूल्य नोंदणीसाठी : https://mahashivratri.antaryogfoundation.in येथे रजिस्टर करा.



हे आयोजन मुंबईत गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथील हॉल क्रमांक १ येथे होत असून भारतभरातील आघाडीचे उद्योजक, खेळाडू, चित्रपट सृष्टीतील दिग्गज व विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिमत्त्वे यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर तब्बल ३ लाख भाविक या सोहळ्याला आपली उपस्थिती लावणार आहेत.

या भव्य आणि दिव्य अशा आयोजनाचा एक भाग म्हणजे, आचार्य उपेंद्रजी गणपती अथर्वशीर्षावरील महाग्रंथाचे प्रकाशन करणार आहेत. या अनोख्या अशा सत्रांतून याआधी कधीही समोर आले नाही असे आध्यात्मिक सत्य समोर येते आणि त्यातून कालातीत ज्ञान आणि मानव जीवनासाठी उपयुक्त असे अतुल्य मार्गदर्शन प्राप्त होते. भावी भक्कम नेते आणि आदर्श समाज निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने हे तयार केले गेले असून या उत्तम अशा कलाकृतीमधून ज्ञान समोर येते आणि त्यातून आयुष्यातील आव्हानांचा सामना करण्याची आणि चांगले माणूस होण्याची एक प्रक्रीया निर्माण होते.

त्याचबरोबर शिव तांडव कार्यक्रम आणि हृदयस्पर्शी असा भावगीतांचा सोहळा सादर होणार असून त्यात अनेक नावाजलेले कलाकार सहभागी होणार आहेत. या संपूर्ण आयोजनात ३ लाखांहूनही अधिक लोक सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यांना अन्नदान आणि प्रसाद यांच्या माध्यमातून पवित्र व शक्तिशाली मंत्रांनी अभिमंत्रित प्रसाद दिला जाणार आहे. त्यातून हे आयोजन म्हणजे सर्वांसाठी समावेशक आणि समृद्ध करणारा अनुभव सिद्ध होणार आहे. अंतर योग फाउंडेशन समाजाच्या सर्वच स्तरातील लोकांना या अतुलनीय अशा अध्यात्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निमंत्रित करत आहे. त्यातून आरोग्यपूर्ण, भरभराट झालेला आणि अध्यात्मिकदृष्ट्या संपन्न असा भारत निर्माण करण्याचे समर्पित उद्दिष्ट आहे.

# ॲक्सिस बँकेच्या बरगंडी प्रायव्हेट आणि हुरुन इंडिया तर्फे चौथी आवृत्ती जाहीर

मुंबई, १८ फेब्रुवारी : ॲक्सिस बँकेचा प्रायव्हेट बँकिंग व्यवसाय २०२४ बरगंडी प्रायव्हेट आणि हुरुन इंडिया ५०० यांनी २०२४ बरगंडी प्रायव्हेट हुरुन इंडिया ५०० ची चौथी आवृत्ती प्रकाशित केली. ही यादी भारतातील ५०० सर्वाधिक मौल्यवान कंपन्यांची आहे. सूचीबद्ध कंपन्यांसाठी मार्केट कॅपिटलायझेशन आणि बिगर-सूचीबद्ध कंपन्यांसाठी मूल्यांकन यानुसार या कंपन्यांची क्रमवारी त्याच्या मूल्यावर आधारित आहे. या यादीमध्ये केवळ भारतात मुख्यालय असलेल्या कंपन्या समाविष्ट आहेत. यात सरकारी कंपन्या आणि परदेशी तसेच भारतीय कंपन्यांच्या उपकंपन्या समाविष्ट नाहीत.

यावेळी बोलताना ॲक्सिस बँकेचे एमडी आणि सीईओ अमिताभ चौधरी म्हणाले: बरगंडी प्रायव्हेटला हुरून इंडियाबरोबर भागीदारी करून भारतातील ५०० सर्वाधिक मौल्यवान कंपन्यांचा गौरव करण्याचा अभिमान वाटतो. २०२४ बरगंडी प्रायव्हेट हुरून इंडिया ५०० अहवाल अतुलनीय परिवर्तन होत असलेल्या भारतातील कॉर्पोरेट क्षेत्राचा एक उल्लेखनीय आढावा सादर करतो. या यादीतील कंपन्यांनी नवीन धोरणे अवलंबून, नाविन्य आणून आणि बदलत्या परिस्थितींशी जुळवून घेत त्यांच्या संबंधित क्षेत्रांमध्ये आघाडीचे नेतृत्व राखले आहे. आजवर कधीही नव्हता एवढा भांडवली बाजार अधिक गतिशील होत असताना या कंपन्यांनी दृष्टीकोन, लवचिकता दाखवत त्यांच्या भागधारकांसाठी प्रचंड मूल्य निर्माण केले आहे.

हुरुन इंडियाचे फाऊंडर आणि चीफ रिसर्चर अनस रहमान जुनैद म्हणाले २०२४ बरगंडी प्रायव्हेट हुरुन इंडिया ५०० मधील कंपन्या भारताच्या खाजगी क्षेत्राचा आधारस्थंभ आहेत आणि त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव टाकतात. या कंपन्यांचे एकत्रित मूल्य ३.८ ट्रिलियन अमेरिकन डॉलर असून ते भारताच्या वार्षिक जीडीपी पेक्षा जास्त आहे. या कंपन्या ८.४ दशलक्ष लोकांना रोजगार देतात. जर तुम्हाला भारतीय अर्थव्यवस्था कशी विकसीत होत आहे हे समजून घ्यायचे असेल तर २०२४ बरगंडी प्रायव्हेट हुरुन इंडिया ५०० मधील सर्वात मौल्यवान कंपन्यांच्या यशोगाथा समजून घेणे हा एक उत्तम मार्ग आहे.

# केबीसी ग्लोबलने १:१ च्या बोनस इक्विटी शेअरला दिली मान्यता

नासिक, १८ फेब्रुवारी : कन्स्ट्रक्शन व्यवसाय आणि रिअल इस्टेट क्षेत्राच्या विकासात व्यस्त असलेल्या नशिक आधारित केबीसी ग्लोबल लि. (बीएसई ५४११६१) च्या संचालक मंडळाने १ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत बोनस अंक १:१ च्या प्रमाणात मान्यता दिली आहे. (प्रत्येकासाठी संपूर्ण देय इक्विटी शेअरसाठी प्रत्येक बोनस इक्विटी शेअर प्रत्येकी १ रुपया).

नजिकच्या भविष्यात विस्तार योजना आणि कर्ज कमी करण्याच्या योजनेसह संचालक मंडळाने अधिकृत भांडवल वाढविण्याच्या प्रस्तावालाही मान्यता दिली आहे. आरओसीनेमंजूर केलेल्या केबीसी ग्लोबल लि.चे नाव इन्फ्रा-ईपीसी लि. अथवा दुसऱ्या नावाने धारण करण्यास प्रस्तावित केले. कंपनीने केबीसी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यूके आधारित संपूर्ण मालकीच्या उपकंपनीच्या अध्यक्षपदी नरेश कर्दा यांच्या नियुक्तीस मान्यता दिली आहे. दरम्यान, अलीकडे पतंजली फूड अँड हर्बल पार्क, फाल्कॉन पीक फंड (सीईआयसी) लि. इतर गुंतवणूकदारांमध्ये ९९.५० कोटी रुपयांच्या कंपनीतील परिवर्तनीय प्राधान्य वॉरंटच्या समस्येद्वारे १ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत कंपनीच्या संचालक मंडळाने एकूण २४५.२३ कोटी रुपये वॉरंट नॉन-प्रचारकांना २.२० प्रति वॉरंट (प्रति वॉरंट १.२० रु.) प्रत्येक वॉरंट १ रुपया प्रत्येकी पूर्णपणे पैसे दिले. इक्विटी इश्यूची रक्कम कर्ज परतफेड करण्यासाठी वापरली जाईल. कंपनीची अतिरिक्त सर्वसाधारण सभा १५ नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे.

जून २०२४ मध्ये, केबीसी ग्लोबल लि.ने आपल्या सहाय्यक कंपनी कार्डा आंतरराष्ट्रीय पायाभूत सुविधा लि.च्या माध्यमातून सीआरजेई (पूर्व आफ्रिका) लि. सीआरजेई कडून मऊ पायाभूत सुविधा विभागात २० दशलक्ष डॉलर्सची नागरी अभियांत्रिकी उपकंत्राट मिळविली आहे.

कंपनीने नुकताच देवळाली, नाशिक येथे नवीन प्रकल्प सुरू केला आहे. हा प्रकल्प जय भवानी रोडवरील सर्वेक्षण क्रमांक/८७/२/२ बी, प्लॉट क्रमांक ४ येथे आहे.

२००७ मध्ये स्थापित कंपनीने देशात निवासी आणि निवासी-कम-ऑफिस प्रकल्प विकसित आणि विक्री करण्यात माहिर आहे. मुख्य प्रकल्पांमध्ये हरी गोकुलधॅम, हरी नक्षत्रा -२ इस्टेट टाउनशिप आणि बरेच काही समाविष्ट आहे. कंपनी निवासी, व्यावसायिक आणि कंत्राटी प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करते आणि रणनीतिक विस्तार योजना स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जाहीर केली आहे.

# टाटा एआयएने विम्याविषयी जागरूकता वाढवण्यासाठी नागपूरमध्ये 'प्लेज टू प्रोटेक्ट' उपक्रमाचे आयोजन केले



नागपूर, १८ फेब्रुवारी : टाटा एआयए लाईफ इन्श्युरन्स या भारतातील एका आघाडीच्या खाजगी जीवन विमा कंपनीने नागपुरात 'प्लेज टू प्रोटेक्ट' या उपक्रमाचे आयोजन करून जीवांचे रक्षण करण्याप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली. आर्थिक वर्ष २०२५ च्या चौथ्या तिमाहीमध्ये १ लाख जीवने सुरक्षित करण्याच्या कंपनीच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाचा हा एक भाग आहे.

नागपुरातील टाटा एआयए एजन्सी टीम, तसेच धरमपेठ, सेंट्रल ॲव्हेन्यू रोड आणि छत्रपती स्क्वेयर येथील शाखांनी मिळून जवळपास १०० ग्राहक, लीडर्स आणि एजंट्सना जीवन विम्यावरील जागरूकता सत्रांमध्ये सहभागी करून घेतले. या उपक्रमामध्ये दात तपासणी शिबिरे आणि ज्ञान ज्योती निवासी अंध विद्यालयाला भेट देणे यांचा देखील समावेश होता, याठिकाणी कर्मचारी व सल्लागारांनी मिळून एक वॉटर कूलर भेट म्हणून दिला तसेच विद्यार्थ्यांना जेवण पुरवले. नागपूर आयटी पार्कमध्ये या टीमने १५० पेक्षा जास्त संभाव्य ग्राहकांशी संपर्क साधून आर्थिक सुरक्षेविषयी माहिती दिली.

टाटा एआयएचे प्रोप्रायटरी बिझनेसचे चीफ डिस्ट्रिब्युशन ऑफिसर श्री अमित दवे यांनी सांगितले, जीवन विमा लोकांना, समाजातील सर्वात असुरक्षित घटकांना हवी असलेली आर्थिक सुरक्षा पुरवतो. त्यामुळे जीवन विम्याविषयी जागरूकता निर्माण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. टाटा एआयए आपल्या 'प्लेज टू प्रोटेक्ट' उपक्रमातून भारतीयांसाठी आर्थिक समावेश आणि आर्थिक सुरक्षेला प्रोत्साहन देत आहे. भारतामध्ये जास्तीत जास्त लोकांना विमा सुरक्षा मिळावी यासाठी आम्ही बांधील आहोत. जानेवारी ते मार्च तिमाहीमध्ये १ लाख जीवने सुरक्षित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी टाटा एआयए अथक प्रयत्नशील राहील.

विम्याबरोबरीनेच, 'जागृती' या आपल्या आर्थिक साक्षरता उपक्रमामार्फत टाटा एआयए आर्थिक सक्षमतेला देखील प्रोत्साहन देत आहे. यामध्ये टाटा एआयएचे कर्मचारी वंचित समुदायांना अत्यावश्यक आर्थिक उपाययोजनांची, साधनांची माहिती देतात. एक संरचनाबध्द प्रशिक्षण मोड्यूल हिंदी, इंग्रजी आणि क्षेत्रीय भाषांमध्ये उपलब्ध करवून देण्यात आले आहे, कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडील माहिती इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या नेटवर्कमधील कमीत कमी चार व्यक्तींना आत्मविश्वास मिळवून द्यावा जेणेकरून त्यांना माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यात मदत मिळावी हा यामागचा उद्देश आहे. ३३०० पेक्षा जास्त टाटा एआयए कर्मचाऱ्यांनी याआधीच या उपक्रमामध्ये भाग घेतला आहे.

## आज का अंदाज

बुधवार १९ फेब्रुवारी २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| १२० | २२० | ६९० | २६९ | १५६ | १३० | ३६८ | ११६ |
| ३०० | ६९९ | ७८० | ४५८ | ४८० | २४८ | ८९० | २२४ |
| २४८ | ५९० | ५०० | ३४० | ६७९ | ३३८ | ४६७ | ३७८ |
| ३९ | ४९ | ५२ | ७२ | २० | ४० | ७९ | ८९ |
| ३० | ४० | ५८ | ७८ | २१ | ४१ | ७५ | ८५ |
| ३१ | ४१ | ५६ | ७६ | २३ | ४३ | ७६ | ८६ |

१९ फेब्रुवारी: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ८३ | ९३ |
| २० | ५० | ८६ | ९६ |
| २४ | ५४ | ८७ | ९७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# मंदिरांचा महाकुंभ - आयटीसीएक्स २०२५' मध्ये आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गोव्याचे मुख्यमंत्री एकाच मंचावर

तिरुपती, १८ फेब्रुवारी : तिरुपती येथील आशा कन्वेन्शन सेंटरमध्ये १७ फेब्रुवारीला संपन्न झालेल्या ''आंतरराष्ट्रीय मंदिर संमेलन आणि प्रदर्शनी २०२५ अर्थात आयटीसीएक्स २०२५'' च्या उद्घाटन समारंभात भारतातील मंदिरांचा वारसा पुनरुज्जीवित करण्याच्या मोहिमेवर असलेले प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वे, प्रसार माध्यमे, भक्तमंडळी आणि भागीदार एकत्र आले होते.



हे तीन दिवसीय कार्यक्रम आयटीसीएक्सचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र विधानपरिषदेचे मुख्य प्रतोद श्री प्रसाद लाड, आयटीसीएक्स आणि टेम्पल कनेक्टचे संस्थापक श्री गिरीश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केले गेले होते आणि अंत्योदय प्रतिष्ठानच्या सहकार्याने पार पडले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे परमपूज्य सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, यांनीही टेम्पल कनेक्ट कडून मंदिरांचा एकत्रित करण्यासाठी आयटीसीएक्स २०२५ च्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा करणारा एक आभासी संदेश दिला, ज्यात २०२३ मध्ये पहिल्या आवृत्तीच्या यशस्वीतेनंतर त्याच्या असामान्य प्रगतीवर त्यांनी भर दिला. त्यांनी सांगितले, पूर्वीच्या काळात मंदिरे भारतीय समाजाचची सांस्कृतिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, आर्थिक आणि सामाजिक केंद्रे होती. आजही, सनातन परंपरा पाळणाऱ्यांमध्ये सर्वांमध्ये मंदिरांबद्दल एक अमाप श्रद्धा आहे आणि हे वेळोवेळी अनेक उदाहरणांनी सिद्ध झाले आहे. ही श्रद्धाच आजही अनेक ठिकाणी मंदिरे सांस्कृतिक केंद्र म्हणून कार्यरत राहण्यासाठी कारणीभूत आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि मुख्य पाहुणे देवेंद्र फडणवीस यांनी आयटीसीएक्स २०२५ चे महत्व अधोरेखित करीत कौतुक करताना म्हटले, मी टेम्पल कनेक्ट उपक्रमामागील टीमचे अभिनंदन करू इच्छितो, जी मंदिरांना अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मदत करत आहे, कारण एका अभ्यासानुसार असे समोर आले आहे कि ५५ टक्के नागरिक आध्यात्मिक पर्यटनाची निवड करत आहेत. संमेलन अहिल्या बाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या औचित्यावर पार पडत असल्याबद्दल त्यांना विशेष कौतुक वाटले. त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनंतर अहिल्या बाई होळकर या एकमेव आशेच्या किरण होत्या ज्यांनी परकीय आक्रमणातून नष्ट झालेल्या मंदिरांना केले. आजच्या काळात देखील सनातनी होण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आणि धर्माने आपले मूल्य कसे रूपांतरित केले, तसेच विविधतेच्या बाबतीत भारताला कसे एकत्र बांधले, यावरही विचार मांडले. टेम्पल कनेक्ट ने सनातन धर्माच्या तत्त्वांवर आधारित एक समुदाय तयार केला आहे, ज्यामुळे सर्व मंदिरं एकत्र आली आहेत. मंदिरे समानता आणि समुदायाचे केंद्र बनावीत अशी आशा त्यांनी व्यक्त केली आणि हे तत्वज्ञान जागतिक चळवळीचे रूप घेत आहे जे सनातन धर्माला एक नवीन दिशा देईल, असेही ते म्हणाले.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस अपेक्षित फळ देणार असणार आहे. नोकरी करणाजयांनी वरिष्ठांच्या सूचनेचे पालन करावे. तसेच वेळेत काम करण्याचा प्रयत्न करा अन्यथा तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

**वृषभ :** आज तुमच्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी घडताना दिसणार आहेत. तुमची दीर्घकाळापासून प्रलंबित कामे लवकर पूर्ण होतील. आज तुमच्या लोकप्रियतेत वाढ होईल. तब्येतीकडे लक्ष पुरवा.

**मिथुन :** राशींच्या व्यक्तींना आज अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागू शकते. यामुळे तुमचे रागावरील नियंत्रण कमी होईल. लोकांशी वाद घालणे टाळा. खर्च वाढू शकतो. ज्यामुळे बजेट बिघडू शकते.

**कर्क :** जर तुम्ही परदेशात करिअर किंवा व्यवसाय करण्याचा प्रयत्न करत असाल तर त्यात तुम्हाला यश मिळेल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्याल. आजचा दिवस आनंद देणार असणार आहे.

**सिंह :** राशीच्या व्यक्तींनी आज कोणतीही समस्या उद्भवली तर संयम गमावू नका. शांत मनाने विचार करा. नोकरी करणाजया लोकांवर अतिरिक्त कामाचा ताण येऊ शकतो. तुम्हाला अचानक प्रवास करावा लागू शकतो.

**कन्या :** पैशांची गुंतवणूक टाळा. प्रवासादरम्यान विशेष काळजी घ्या. इतरांशी नम्रतेने वागले पाहिजे. प्रवास आनंददायी ठरेल आणि नवीन मित्र मिळतील. व्यवसाय करण्यापूर्वी तुमच्या हितचिंतकांचा सल्ला घ्या.

**तुळ :** आर्थिक दृष्टिकोनातून आजचा तुमच्यासाठी उत्तम असेल. नोकरी करणाजयांसाठी उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. वैवाहिक जीवन आनंदी राहील. आज प्रेमसंबंधात कोणताही मोठा निर्णय शहाणपणाने घ्या.

**वृश्चिक :** वैवाहिक जीवनात आनंद राहील. मीन राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस धावपळीचा असेल. तुमच्यावर कामाचा अतिरिक्त ताण असेल. अनावश्यक खर्च करणे टाळा. धोकादायक गुंतवणूक टाळा.


**धनु :** आज तुमची खूप जास्त धावपळ होईल. जमीन किंवा घर खरेदी-विक्री व्यवहाराबद्दल कागदपत्रे नीट तपासा. आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. एखाद्या गोष्टीवरून तणाव निर्माण होऊ शकतो.

**मकर :** इतरांची दिशाभूल करू नका. परस्पर समन्वय बिघडू देऊ नका. आनंदात वाढ होईल. आज कामाच्या ठिकाणी अडथळे कमी होतील. तुमच्या कामाच्या कौशल्याने तुम्ही लोकांना प्रभावित कराल.

**कुंभ :** राजकीय क्षेत्रात नवीन सहयोगी लाभदायक ठरतील. नोकरीत बढती होईल. आज व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. वडिलोपार्जित संपत्ती मिळण्याची शक्यता आहे.

**मीन :** व्यापार क्षेत्रात शुभ संकेत मिळतील. घाईगडबडीत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. नोकरी मिळविण्यासाठी तुम्हाला अजून थोडा वेळ वाट पाहावी लागेल. प्रेमसंबंधात दिखावा टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २०३८



**आडवे शब्द :-**
१) अत्यंत संथ गतीने
६) खून, हत्या
८) शपथ
११) धाड घालणे, लुटणे
१३) आशीर्वादाचा हात
१४) बळकट
१६) उत्सवाचे दिवस
१७) अंत:करण
१८) खोलवर
१९) सदोदित
२१) हद्द
२२) पहारेकरी
२५) बांबू
२६) संपूर्ण
२८) नदीचे तीर
२९) बनकर
३०) कमी बोलणारा
३२) दिवा
३३) पाण्यावरील लाट
३५) गैरसावध
३७) विरी, शक्ती सामर्थ्य
३८) एकटा, खच सिंचन
४०) गव्हाचे पीठ
४१) कैफ मद
४२) एक ऋतू
४३) मोठे डोळे, विद्रूप
४६) पायाचे उभे हाड
४८) एक कडवे धान्य
४९) समुद्रकिनारा
५२) बळ, शक्ती
५४) माळ धारण करणारा
५६) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
५९) बोबडी वळाल्या नंतरची भाषा
६१) ऋण
६२) च्या बरोबर
६३) श्रम
६४) ओटा, पार
६५) उथळ वाटी
६६) मीन
६८) विरोध, अडथळा
७०) रमापती
७३) तामसी रागीट
७५) वाळवी
७६) दृष्टी
७७) डबके, तट्ट फुगलेला

**उभे शब्द :-**
२) संस्कृत भाषा
३) बदल
४) लोभी
५) बळ, दम, भार
६) हिरव्या विषारी सापाची जात
७) साहित्यातील नऊ भावना
८) पाऊल
९) सोशीक, सोसण्याचा स्वभाव
१०) झकास
१२) महिना
१४) श्रीरामाचे वडील
१५) कट्टर, ठाम मताचा
१८) नेहमी
२०) रामदासस्वामींचा एक ग्रंथ
२३) गोंधळ, मोठा आवाज
२४) शरम
२५) उमलण्यापूर्वीची फुलाची अवस्था
२७) मनाचा ओढा
२९) मागणारा
३०) वजनदार
३१) हाताचा तळवा
३४) गरीब, निर्धन
३६) वस्तू, माल ३७) विसंगती,
३८) साईबाबांचा एक संदेश
३९) छोटा दरवाजा
४४) भरभराट
४५) त्या प्रमाणे
४७) लो टिळकांनी लिहिलेला एक टीका ग्रंथ
५०) बेपता, ठावठिकाणा न लागेल असे
५१) तात्काळ
५३) अरुंद तोंडाची लांब पिशवी
५५) यथाशास्त्र, पद्धतीनुसार
५७) धमनी
५८) आठ
६०) लवकर, चटकन
६३) जनावरांचा घोळका
६७) एक चतुर्थांश भाग
६८) शंकर, प्रत्येक
६९) दालचीनीचे झाड
७१) शोध, तपास
७२) रडकथा
७३) चांदणी
७४) एकाग्र नजर

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर अमरावती
बुधवार, दि. 19 फेब्रुवारी 2025
पान 6

# परतवाडा-धारणी रस्त्याचे निर्माण कार्य कासवगतीने

## दीड वर्षानंतरही काम पूर्ण होईना | गौरखेडा कुंभी-मल्हारा मार्गावर वाहतूक कोंडी

### वाहनचालक त्रस्त, बांधकाम विभागाची दिरंगाई



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, (दि. 18)** - सरकारी काम आणि पाच वर्ष थांब याची प्रचिती परतवाडा - धारणी मार्गाच्या निर्माण कार्याच्या बाबतीत येत आहे. या मार्गावर काही टप्प्यांचे काम दीड वर्षांपासून अत्यंत संथगतीने सुरु आहे. प्रदिर्घ कालावधी होवूनही रस्ता बांधून तयार होत नसल्याने या मार्गावर वाहतुकीची कोंडी होत आहे. प्रामुख्याने गौरखेडा कुंभी-मल्हारा मार्गावर वाहनचालकांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची दिरंगाई यासाठी कारणीभूत ठरत असून त्याबद्दल रोष व्यक्त करण्यात येत आहे.

अचलपूर तालुक्यातील परतवाडा ते धारणी रस्त्याचे काम सध्या सुरु आहे. परतवाडा पासून जवळच असलेल्या गौरखेडा कुंभी व मल्हारा येथून धारणीकडे जाणा?या रस्त्याच्या कामाला दीड वर्षांपूर्वी सुरुवात झाली होती. मात्र हे काम अक्षरशः कासवगतीने सरु असून दिर्घ कालावधीनंतरही रस्ता पूर्णत्वास पोहोचण्याची कोणतीही चिन्हे दिसून येत नाहीत. परतवाडा पासून पुढे पाच ते सहा किलोमीटर रस्त्याच्या बांधकामाला एवढा उशिर लागत असल्याने बांधकाम विभागाबाबत संताप व्यक्त केला जात आहे. गौरखेडा कुंभी व मल्हारा येथील रहिवाशांना या कामामुळे चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे.

दोन्ही बाजूला तीन ते चार फुटाचे चर खोदून त्यात कच्चा मुरुम टाकण्यात आला आहे. मुरमांचे ढीगारे रस्त्याच्या दुतर्फा अस्ताव्यस्त पसरलेले आहेत. त्यामुळे अरुंद रस्त्यावरुन वाहन चालविताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मल्हारा गावातील मुख्य ठिकाणी रस्त्यावर गीट्टी पसरवून ठेवली आहे. त्यामुळे हे ठिकाण अपघाताला आमंत्रण देत आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठाले खड्डेही पडले आहेत. याबाबत ग्रामस्थांकडून ओरड होत असली तरी रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग पूर्णतः उदासिन दिसून येत आहे.

एकीकडे कमी वेळात जास्त लांबीचे रस्ते बांधण्याचे विक्रम होतं असताना अचलपूर सार्वजनिक बांधकाम विभाग पाच किलोमीटर रस्ता पाच वर्षांत बांधून एक वेगळाच विक्रम स्थापित करणार की काय, अशी चर्चा नागरिकांमधून ऐकायला मिळत आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी एखादा फेरफटका या रस्त्यावर मारून या प्रकरणात लक्ष घालावे अशी स्थानिक नागरिकांचीही मागणी आहे.



"परतवाडा ते धारणी रस्त्याचे काम संथगतीने सुरू आहे. आमच्या गावात ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र व आठवडी बाजार सुद्धा भरतो. एक वर्षापासून गावातील नागरिकांना या कामामुळे त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत कार्यकारी अभियंता अचलपूर यांना भेटून काम तात्काळ पूर्ण करण्याची विनंती करण्यात आली आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष चालविले आहे.

**नारायण बोरेकार**
**सरपंच ग्रामपंचायत मल्हारा**



"गौरखेडा कुंभी येथे या रस्त्याचे काम एक ते दीड वर्षापासून सुरु असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या असून रस्त्यावर अपघात झाले आहेत. रस्त्यावर मोठाले खड्डे पडले आहेत ते सुद्धा बुजवले गेले नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर कामांसाठी कंत्राटदारा सोबत मिलीभगत तर केली नाही ना? तसं नसेल तर लवकरच सदर रस्त्याचे काम पूर्ण करून देण्यात यावे.

**मुरलीधर पडोळे**
**ग्रामपंचायत सदस्य, गौरखेडा कुंभी**



# मानवी मूल्यांच्या उत्कर्षासाठी कथा श्रवण करा!

सुरज महाराज पोहोकार यांचे आवाहन

मालखेड येथे शिव महापुराण कथा

गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त आयोजन





**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे, (दि.18)** - तालुक्यातील मालखेड रेल्वे येथे श्री गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त शिव महापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात कथावाचक हभप सूरज महाराज पोहोकार (आळंदी देवाची) महाराज यांच्या अमृतवाणीतुन शिव महापुराण कथेचे निरुपण सुरू झाले आहे. मानवी मूल्यांच्या उत्कर्षासाठी कथा श्रवण करणे काळाची गरज आहे. त्यातून मानवी जीवनाचे उत्थान होउ शकते, असे प्रतिपादन सूरज महाराज पोहोकर यांनी याप्रसंगी केले. मालखेडच्या अंबादेवी मंदिराचे महंत शिवानंदपुरी महाराज यांच्या मार्गदर्शनात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 20 फेब्रुवारीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संपूर्ण पूजापाठ, आरतीची जबाबदारी गावातील पंडित संजयपंत जोशी महाराज सांभाळत आहे. दररोज पहाटे श्रींचा अभिषेक करण्यात येतो. ज्ञानेश्वरी वाचन हभप संतोष इंगोले महाराज करतात. नंतर काकडा आरती, शिव कथा, हरिपाठ, तर रात्री 11 पर्यंत हरिकीर्तन होते. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व गणेशोत्सव मंडळ, दुर्गोत्सव मंडळे तसेच गावातील सर्व भजनी मंडळे, महिला भजनी मंडळे श्रमदान व सहकार्य करित आहे. अरुणेश्वरधाम येथील महंत चंद्रशेखर पुरी महाराज, रुपेश चापले महाराज, नयन पराडकर महाराज, सचिन खापरे महाराज, देविदास जलदेकर महाराज, विठ्ठल महाराज, ज्ञानेश्वर निचत, यश मेश्राम, स्वरूप दुधे, शिवम पोकळे, अथर्व निचत, नक्ष निचत हे शिव कथेला संगिताची साथसंगत करित आहेत.

# स्काउट-गाईड मेळाव्यात एकविरा शाळेने पाडली छाप



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, (दि.18)**- अमरावती जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग आणि अमरावती जिल्हा स्काउट-गाईड कार्यालयाच्या वतीने नूकतेच भातकुली येथील माध्यमिक आदिवासी आश्रम शाळेत तीन दिवसीय जिल्हास्तरिय स्काउट-गाईड मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात दर्यापूर येथील एकविरा स्कूल ऑफ ब्रिलियंट्सच्या स्काउट - गाईड पथकाने सक्रिय सहभाग घेउन आपली छाप सोडली.

या मेळाव्यात जिल्हाभरातील अनेक शाळांचे पथक सहभागी झाले होते. एकविरा शाळेच्या स्काउट-गाईड पथकाने विविध स्पर्धांमध्ये सहभागी होवून उत्कृष्ठ प्रदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेउन सादरीकरणाद्वारे सर्वांची वाहवा मिळविली. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेच्या पथकाला प्रोत्साहनपर पूरस्कारही प्राप्त झाला. शाळेच्या क्रीडा शिक्षिका दीपिका गुलवाडे, विजय शिरसाट, अर्चना साखरे यांच्या मार्गदर्शनात एकविरा शाळेचे स्काउट-गाईड पथक या जिल्हास्तरिय मेळाव्यात सहभागी झाले होते. शाळेचे प्राचार्य लिझेश रामकृष्णन व शाळेच्या विश्वस्त मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

# गजानन महाराज प्रगटदिनी शासकीय सुट्टी जाहीर करा

## अंजनगाव बारीच्या श्री भक्तांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, (दि.18)**- शेगाव येथील श्री संत गजानन महाराज यांचा प्रगट दिन संपूर्ण विदर्भासह महाराष्ट्र राज्यात ठीक ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सर्व अबालवृद्ध स्त्री-पुरुष गजानन भक्त श्रींच्या प्रगट दिन महोत्सवात उत्साहाने सहभागी होतात. त्यामुळे प्रगट दिनाच्या दिवशी शासकीय सुट्टी जाहिर करण्यात यावी, अशी मागणी अंजनगाव बारी येथील गजानन भक्तांनी केली आहे.

श्री संत गजानन महाराजांचे लीला स्थळ असलेले श्री क्षेत्र शेगाव आज विदर्भाची पंढरी म्हणून ओळखले जाते. राज्यभर गजानन महाराजांचा मोठा भक्त संप्रदाय आहे. महाराजांचा प्रगट दिन महोत्सव दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. ठिकठिकाणी भव्य स्वरूपात महोत्सव व कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा 20 फेब्रुवारी रोजी श्री गजानन महाराजांचा प्रगट दिन आहे. त्यानिमित्त सर्वत्र महोत्सव साजरा केला जात आहे. प्रगट दिनाच्या दिवशी लाखो भक्त महाराजांच्या दर्शनासाठी शेगावला जात असतात. सर्व गजानन भक्तांच्या सुविधेसाठी प्रगट दिनानिमित्त शासकीय सुट्टी जाहिर केली जाणे आवश्यक आहे, असे श्री गजानन भक्तांचे म्हणणे आहे. या संदर्भात अंजनगाव बारी येथील गजानन भक्त व सामाजिक कार्यकर्ते प्रमोद निचत यांनी जिल्हाधिकारी व जनप्रतिनिधींना निवेदनही सादर केले आहे. जिल्हाधिकारी स्वत:च्या अधिकारात तीन सुट्ट्या देऊ शकतात.

# राजाराम प्रतिष्ठानतर्फे आज शिवजन्मोत्सव सोहळा!



**अमरावती** - राजाराम प्रतिष्ठान आणि शिवभक्तांच्या वतीने विदर्भातील भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. आज, 19 फेब्रुवारी 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता, हर्षराज चौक, विद्युत नगर, अमरावती येथे हा सोहळा संपन्न होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किरण महल्ले (अध्यक्ष, राजाराम प्रतिष्ठान, अमरावती) उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून आमदार तथा भाजप अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील आणि आमदार सुलभा खोडके यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच टायगर ग्रुप महाराष्ट्राचे अध्यक्ष तानाजी जाधव आणि शिवभक्त प्रतिष्ठान, पुणे चे अध्यक्ष अनिकेत घुले हे विशेष अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत. या सोहळ्यात प्रसिद्ध वक्ते सोपान कनेरकर यांचे प्रेरणादायी व्याख्यान होणार असून, छत्रपती ढोल ताशा व ध्वज पथक, अमरावती यांचे भव्य सादरीकरण पाहायला मिळणार आहे. राजाराम प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख यांनी अमरावतीतील शिवप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढविण्याचे आवाहन केले आहे.






# कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकरी ते ग्राहक उद्देश साध्य झाला!

## खा. बळवंत वानखडे, जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीचा समारोप




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.18)**- जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीच्या माध्यमातून इतर ठिकाणची पिके, नवतंत्रज्ञान यासोबतच शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचल्या आहेत. त्यामुळे प्रदर्शनीचा उद्देश सफल झाला असून प्रदर्शन फलदायी ठरले असल्याचे मत खासदार बळवंत वानखेडे यांनी व्यक्त केले.

जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीचा समारोप मंगळवारी (ता.18) करण्यात आला. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुनील सोसे, प्राचार्य अनिल ठाकरे, हरिभाऊ मोहोड, राजीव ठाकूर, विनय बोथरा आदी उपस्थित होते. खा. वानखेडे यावेळी पुढे म्हणाले, प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना इतर ठिकाणची पिके पहावयास मिळाली. तसेच उत्पादनावर प्रक्रिया करून स्वतः माल विकण्याची संधी प्रदर्शनीच्या माध्यमातून मिळाली. याठिकाणी शेतीमध्ये बदलत असलेल्या नवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली.

या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असे हे प्रदर्शन झाले असल्याचे सांगितले. प्रदर्शनीला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. तसेच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर भेटी दिल्या. त्यामुळे वितरकही समाधानी झाले. शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पादनाचे स्वत: मार्केटींग करून यशस्वी व्हावे, असे आवाहन लहाळे यांनी केले. निस्ताने यांनी 288 स्टॉलच्या माध्यमातून 381 शेतकऱ्यांनी प्रदर्शनीत सहभाग नोंदविला. 50 हजार नागरिकांनी भेटी दिल्या, तर 70 लाखांची उलाढाल झाली असल्याचे सांगितले. सुरूवातीला पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

ड्रोन पायलट निमिका सुरेश दोडी, पाकसाड काटपिडीया, अमित जयसिंगपूरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रदर्शनीमध्ये सहभागींना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. निलेश राठोड यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

## निवृत्त न्यायाधीश करणार चौकशी

**अमरावती** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अनियमितता झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्तीच्या अध्यक्षतेत स्थापित चारसदस्यीय समिती चौकशी करणार आहे. या समितीला तीन महिन्यांत शासनाला चौकशी अहवाल सादर करावा लागणार आहे. या अनियमिततेबाबत राज्य शासनाकडे तक्रार करण्यात आली आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील अनेक गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मारोतीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने बुधवार, 12 फेब्रुवारीला चौकशी समितीची पुनर्रचना केली आहे.






# अखंड स्फुर्तीचा झरा जाणता राजा

जाणता राजा, रयतेचा राजा म्हणून जगभरात दरारा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती 19 फेब्रुवारी ला साजरी केली जाते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्वभावातील सहिष्णुता, दूरदृष्टी, करारीपणा व धाडसी वृत्ती अशी काही वैशिष्ट्ये शिवाजी महाराजांची सांगता येतील. शिवाजी महाराजांच्या अनेकविध गोष्टी आजही समाजाला प्रेरणा देतात. शिवाजी महाराजांची प्रेरणा घेत लोकमान्य टिळक स्वातंत्र्य संग्रामात सहाभागी झाले होते. तसेच टिळकांनी तरुणांची मोट बांधण्यासाठी शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा करण्याची प्रथा सुरु केली.

शिवाजी महाराज त्या प्रदेशात रहात होते तो प्रदेश आदिलशहाच्या अधिपत्याखाली होता. तेव्हा त्यांच्या विरोधात बंड करणे म्हणजे प्राणाशी गाठच असायची. डोळे फोडणे, मालमत्तेची राखरांगोळी करुन जबर दंड बसवणे, कुटुंबांसह जाळून हत्या करणे, तोफेच्या तोंडी देणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायाखाली चिरडून मारणे किंवा घोड्यांच्या पायांना बांधून फरपटत नेणे अशा अमानुष शिक्षा दिल्या जात असत. अशा शिक्षा भोगण्यापेक्षा त्यांच्या पायाशी शरण जाणे परवडेल अशी मानसिकता समाजात होती. पण शिवाजी महाराजांनी अशाही परिस्थितीत परकीयांची राजवट उलथून टाकून स्वतःचे राज्य निर्माण करण्याचा पण केला. हे त्यांचे महान कार्य आजही प्रेरणा देत असते.

छत्रपती शिवराय म्हणजे ज्यांचे नुसते नाव उच्चारताच आपल्या हदयाची स्पंदने आनंदाने आणि अभिमानाने उत्तेजित होतात. संपूर्ण अंगावर रोमांच उभे राहतात आणि आपल्या नसानसांतून रक्ताचा प्रवाह दुप्पट वेगाने सुरु होतो. कसली जादू आहे या नावात.

जगभरातल्या कित्येक तत्वचिंतकांनी, क्रांतीकारकांनी महाराजांच्या चरित्रापासून प्रेरणा घेऊन आपल्या कायार्ची दिशा ठरवली आहे. छत्रपती शिवराय म्हणजे उत्तुंग पराक्रमाचे, प्रखर स्वाभिमानाचे आणि जाज्वल देशभक्तीचे मूर्तिमंत उदाहरण. छत्रपती शिवरायांनी अत्याचारी आणि जुलमी राजवटीविरोधात स्वराज्यातील सामान्य माणूसही विद्रोह करु शकतो, ही भावना निर्माण केली. छत्रपती शिवराय म्हणजे स्वराज्याची स्थापना करुन या मातीतल्या गोरगरीब माणसाला स्वाभिमानाने जीवन जगण्याची प्रेरणा देणारे युगपुरुष.

स्त्रीला मातेचा दर्जा देवून, स्त्री ही मराठयांच्या देव्हाऱ्यातील देवता आहे. अशी निर्मळ भूमिका घेणारे महामानव. या मातीत आत्मसन्मानाची फुंकर घालणारे द्रष्टे राजे, शिवरायांच्या चरित्राचा, त्यांच्या कर्तत्वाचा मागोवा घेतल्यास छत्रपती शिवराय म्हणजे अखंड स्फूतीर्चा झरा आणि जगातील सर्वोच्च आदर्शाचा मानबिंदु आहेत हे आपल्या लक्षात येईल.

शिवरायांनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मावळयांच्या सोबतीने स्वराज्याची स्थापना केली. शिवरायांचे स्वराज्य हे कोण्या एका जातीधर्माचे नव्हते तर अठरापगड जातीधमार्चे होते.

**कविता फाले-बोरीकर**
**माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर.**

शिवरायांनी उभ्या आयुष्यात कधी माणसामाणसात भेद केला नाही. त्यांचा लढा हा स्वराज्याच्या आड येणाऱ्या राजसत्तेविरुध्द होता. जुलमी मुस्लिम शासकांविरुध्द होता. मुस्लिम समाजाशी नव्हे, ते इस्लाम धर्माच्याही विरोधात नव्हते. त्यांना मुस्लिमांबद्दल सुध्दा तेवढाच आदर होता. म्हणूनच त्यांनी रायगडसारख्या किल्ल्यावर मुस्लिम बांधवांसाठी मशीद बांधली. त्यांच्या सैन्यात मुस्लिमांनाही मानाच्या जागा होत्या.

शिवरायांच्या राज्यकारभारात जातीयता नव्हती. त्यांचे राज्य धर्मवादी नव्हते. प्रसंगी प्राणाहुती देण्याचीही त्यांची तयार असायची पन्हाळ्याच्या वेढयातून शिवाजी राजे सहीसलामत निसटण्याकरिता शिवा न्हाव्याने हसत हसत मृत्युला कवटाळले, बाजीप्रभूंनी मूठभर मावळयांच्या सोबतीने घोडखिंड लढविली आणि महाराज सुखरुप पोहोचल्याची वार्ता समजल्यावर प्राणार्पण केले. आग्रा कैदेतून शिवाजी राजांना निसटण्यासाठी हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहता यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला.

सिंहगड सर करण्याची मोहिम तानाजीने मुलाचे लग्न बाजूला ठेऊन प्राधान्याने पार पाडली. अफजलखान वधाच्या प्रसंगी जीवा महालाने जीव धोक्यात घालून शिवाजी राजांना वाचविले. अशा अनेक इतिहासाला ज्ञात-अज्ञात असणाऱ्या प्रसंगांवरुन हेच स्पष्ट होते की शिवाजी राजांना जागविण्यासाठी, शिवशाही उभारण्यासाठी आपले शिर तळहातावर घेऊन सामान्य प्रजा तयार होती आणि ती प्रजा कुण्या एका धर्माची, पंथाची, जातीची नव्हती. त्यामुळेच जातिभेद अथवा धर्मभेद न करता बुध्दीप्रामाण्यवादी वृत्तीने, सर्वधर्मसमभाव या न्यायाने रयतेशी वागणारे शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष राजे होते. शिवाजी महाराजांचे जीवन एका आख्यायिकेप्रमाणेच असल्याचे भासते. जाणून घेऊया शिवाजी महाराजांबद्दलच्या काही रंजक गोष्टी.

**शिवाजी महाराजांचे ते सात घोडे**

शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे होते. शिवाजी महाराज घोड्यांचा वापर निर्णायक प्रसंगी करत असत. शिवाजी महाराजांनी अनेक मोहिमांमध्ये घोड्यांचा वापर नेमकेपणाने केला. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास, तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे सात घोडे होते. कृष्णा या पांढऱ्या घोड्यावर शिवाजी महाराज राज्यभिषेकानंतर बसले होते. सुरतवर चढाई, आग्राहून सुटका अशा मोहिमांवर त्यांनी विजय मिळवला.

**शिवाजी महाराजांचे गड-किल्ले**

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे 400 गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वतः बांधले, तर काही किल्ले लढाया करुन जिंकले. महाराजांचे गड-किल्ले म्हणजे स्थापत्यशास्त्रज्ञ, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते.

**शिवाजी महाराज : अभियंता, भूगर्भशास्त्रज्ञ**

आजच्या घडीला आपण ३०० फूट बोअर घेऊनही पाणी लागत नाही. परंतू महाराजांच्या ४०० वषानंतरही महाराष्ट्रातील कुठल्याही किल्लूयावर गेलो, तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावरील टाक्यांमधून स्वच्छ पाणी आढळते. या गड-किल्ल्यांवर कोणतीही पाईपलाईन दिसत नाही.

शिवाजी महाराजांनी प्रत्येक किल्ल्यावर २ प्रकारचे हौद बांधले. एक खुले आणि दुसरे भूगर्भात किल्लूयावरील पाण्याचे हौद वा टाक बांधकामात खडक फोडण्यासाठी दारुगोळा किंवा सुरुंग कधीच वापरले नाहीत. त्याऐवजी नैसर्गिक साधनांचा वापर करुन खडक फोडले. म्हणूनच टाक्यांचा आकार एकदम आयताकृती आहे. याच टाक्यांमधील पाणी संपूर्ण गडावर वापरले जायचे. वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाइन करुन राजगड बांधल्याचे सांगितले जाते.

**अष्टप्रधान मंडळ**

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अष्टप्रधान मंडळाचे महत्त्व अनन्य साधारण होते. या अष्टप्रधान मंडळात ८ मंत्री होते. ३० विभागांत त्यांचे काम विभागलेले होते. यातील कामाच्या व्यवस्थापनासाठी ६०० कर्मचारी नेमण्यात आले होते. महाराजांसमोर येणाऱ्या प्रकरणांचा समोरासमोर निकाल लावला जात असे. रायगडावर कामासाठी आलेला प्रत्येक व्यक्ती भोजन केल्याशिवाय गडउतार होत नसे.

**चारित्र्यसंपन्न जाणता राजा**

जगाच्या इतिहासात हा एकमेव राजा आहे. ज्याच्या दरबारी कधी स्त्री किंवा नर्तकी नाचली नाही. महाराजांनी स्वतःसाठी मोठे महाल बांधले नाहीत. सत्तेचा वापर स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या फायद्यासाठी केला नाही.

शिवाजी महाराज नेहमी रयतेचं स्वराज्य असाच शब्द वापरत. महाराष्ट्राच्या किनार पट्टीवर १६७१ मध्ये मीठ शेती केली जायची. परंतु इंग्रज, डच, पोतुर्गीज यांनी तेथील शेती मोडीत काढण्यासाठी गोवा प्रांतातून मीठ आणून त्याची स्वस्तात विक्री सुरु केली, हे लक्षात आल्यावर महाराजांनी आयात मिठावर कर लावला, त्यामुळे आयात मीठ महाग झाले व आपल्या शेतकऱ्यांच्या मिठाची मागणी वाढली. म्हणूनच छत्रपतींना जाणता राजा म्हणतात. अशा अनेक गोष्टी छत्रपतींनी रयतेसाठी पुढाकार घेऊन केल्या.

शिवाजी महाराजांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले आणि अक्षरशः मुठभर सहकार्यांच्या मदतीने त्यांनी इतिहास दत्त कार्य केले, असे करण्यासाठी लागणारी धीरोदात्त वृत्ती, संकटाशी मुकाबला करण्यासाठी करावे लागणारे बिनचूक नियोजन आणि त्या नियोजनप्रमाणे काम पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले व्यवस्थापन हे गुण त्यांच्या ठायी होते म्हणूनच हे शक्य झाले. भूमीवर अधिपत्य गाजवणारे अनेक भुपतीङ्ग या जगती जन्मले आणि मेले, परंतु करोडो हृदयावर अधिपत्य गाजवणारे एकच शिवछत्रपती अवतरले!! छत्रपती शिवाजी महाराज ..

गगन भेदी नजर ज्याची,
पहाड सम विशाल काया !!
धगधगता सूर्य ही झुकतो
वंदितो तुला शिवराया !!!

■ ■ ■

# छत्रपती शिवाजी राजा आणि महाराष्ट्र माझा ॥

**महाराष्ट्रच नव्हे तर अख्ख्या भारताचे लाडके छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवरायांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. शिवाजीरिजे आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजीराजे यांचा संयुक्त नामोल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार शिवाजी महाराजांचा जन्म- १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू- १७०७ या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात.**

-----------------

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो.

अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले.

रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स.१६७४मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले.

भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी छ. शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती.

एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती.

शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती.

छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुनःस्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले.

**कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी**
**गडचिरोली**
**९४२३७१४८८३**

शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत.

हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे शिक्षण, परकीय सत्तेविरूद्ध लढा देण्यात आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते.

जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

शिवरायांची राजमुद्राः छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी-

***प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता***
***शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते!***

त्याचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल.

बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील.

महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते.

शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले.

शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले.

प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला.

शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे जोखमीचे काम होते.

एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला.

तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली.

अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स.१६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले.

शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू दि.३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला, असे सांगितले जाते. शिवजयंती निमित्ताने शिव छत्रपतींना मानाचा मुजरा!!

■ ■ ■

# शिवजयंती



१९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती (दिनांकानुसार, शासकीय) साजरी केली जाते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे ढ़छत्रपती शिवाजी महाराजढ़! छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा महाराष्ट्रातील प्रत्येक शिवभक्तांसाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी दिवस आहे.

आज ठिकठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. पोवाडे, गाण्यांचे कार्यक्रम, रॅली, भाषणे यांसारख्या उपक्रमांमुळे शिवचरित्राचा प्रचार होतो, हे नक्कीच प्रशंसनीय आहे.परंतु अशा कार्यक्रमाचे आयोजन म्हणजेच शिवरायांना दिलेली खरी आदरांजली ठरेल का? किंवा त्यांचे एक दिवस केलेले हे कार्यक्रम म्हणजेच स्मरण ठरेल का? याचा विचार करायला हवा.

त्यांचे आचार, विचार, शौर्य, ध्येयनिष्ठा आणि नेतृत्वगुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करण्याची आज आवश्यकता आहे.

शिवराय लहानपणापासूनच शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम होते. कुस्ती, दांडपट्टा, घोड्यावर स्वार होणे, तलवार चालवणे अशा खेळांमुळे त्यांच्यात निर्भयता, क्षात्रवृत्ती, अन्यायाविरुद्ध चीड, लढाऊवृत्ती, तसेच नेतृत्वक्षमता असे अनेक गुण निर्माण झाले. परंतु आजची मुले संगणकावर काल्पनिक खेळ खेळतात. त्या खेळातून विध्वंसक आणि विकृत विचारप्रवृत्ती वाढते. अशा खेळांतून मनाची दुर्बळता आणि आत्मकेंद्रितपणा देखील वाढतो. ती आत्मकेंद्रित बनल्याने त्यांच्यात राष्ट्रप्रेम; मला या राष्ट्रासाठी जगायचेआहे ,काही करायचे आहे,असे व्यापक विचार कसे निर्माण होणार? तेव्हा शिवरायांप्रमाणे आपल्या मुलांमध्ये देखील धर्मप्रेम, राष्ट्रप्रेम निर्माण करण्यासाठी त्यांच्यावर योग्य संस्कार करणे गरजेचे आहे. शिवाजी जन्माला यावा पण शेजारच्या घरात, अशी वृत्ती नको.

खोट्या आणि काल्पनिक गोष्टींचे वाचन न करता श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या कथांचे वाचन, धर्मग्रंथांचे वाचन करायला त्यांना प्रवृत्त करायला हवे. ज्यामुळे त्यांच्यात देवभक्ती, राष्ट्रभक्ती निर्माण होईल. श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या चरित्रातून धर्म, न्याय आणि राष्ट्रप्रेम यांचे महत्त्व समजते. त्यामुळे, प्रत्येक आईने जिजाऊ होण्याचा संकल्प करून आपल्या मुलांमध्ये राष्ट्रप्रेम आणि स्वधर्माभिमानाचे संस्कार रुजवले पाहिजेत.

शिवरायांचे अनुकरण करणे, म्हणजे केवळ जयघोष करणे नव्हे, तर त्यांचा निःस्वार्थी सेवाभाव, धैर्य, न्यायप्रियता, स्वराज्यनिर्मितीची तळमळ आणि त्यांचे तत्त्वज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात आत्मसात करणे हीच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी होईल.

------------------------

**सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

■ ■ ■

## छत्रपती शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांचे
न्यायाचे हिंदवी स्वराज्य
प्रजेच्या कल्याणासाठी
स्वराज्य स्थापनेचे केले कार्य

सर्व जाती धर्मांचे होते
कल्याणकारी स्वराज्य
राजवटी बद्दल इतिहासात
प्रसिद्ध महाराष्ट्र राज्य

शिवरायांनी सिंधुदुर्ग
विजयदुर्ग समुद्रकिल्ले बांधले
गुप्तहेर खात्याचा प्रमुख
बहिर्जी नाईक यांना केले

स्वराज्याचा खजिना होता
द्रव्याने सतत भरलेला
पायदळाच्या प्रमुखाला
सरनोबत नावे गौरवलेला

शिवरायांनी राजधानीसाठी
रायगडाची निवड केली
1674 ला शिवरायांच्या
राज्याभिषेकाची तारीख ठरली

शिवरायांनी आपल्या प्रजेवर
मातेसारखी माया केली
फितुरी पासून राज्याला धोका
होऊ नये ही खबरदारी घेतली

शिवरायांनी गनिमी काव्याने
प्रचंड फौजेचा धुव्वा उघडवला
मुत्सद्देगिरीच्या जोरावर
हिंदवी स्वराज्याचा झेंडा रोवला

**सौ.चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**

■ ■

# शून्यातून हिंदवी स्वराज्य उभारणारे 'छत्रपती'!

छत्रपती शिवाजी महाराज हे या देशाचे अद्भुत आणि शाश्वत असे स्फूर्तीस्थान आहेत ! पाच पातशाह्यांशी शक्ती आणि युक्ती यांच्या सामर्थ्यावर लढा देऊन हिंदू शक्तीशाली मोगलांना आव्हान देऊ शकतात, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शक्य करून दाखवले!

सर्व वीरांचे आदर्श स्थान असलेल्या शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये शेकडो वर्षांनंतर हिंदु धर्म आणि संस्कृती यांचा महाशक्तीशाली आणि बलाढ्य राजसत्तेचा भगवा झेंडा रायगडावर फडकवला!

छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेले हे हिंदवी स्वराज्य आणि त्याच्या स्थापनेची प्रक्रिया ही संपूर्णतःच एक दैवी प्रक्रिया होती. स्वाभिमानशून्य हिंदूंना लढण्याची प्रेरणा देणे आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेची निर्मिती करणे ही एक बुद्धीगअगम्य घटनाच म्हणावी लागेल ! छत्रपती शिवरायांची भवानीमातेवर निःस्सीम श्रद्धा होती. त्यांच्या मुखात अखंड जगदंब जगदंब। असे उच्चारण असे.

वयाच्या १६ व्या वर्षी शिवरायांनी रायरेश्वरावरील शिवपिंडीवर रक्ताच्या धारेचा अभिषेक करून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती. छत्रपतींच्या जीवनातील अफझलखानाचा वध, आग्र्याहून सुटका, सिंहगड जिंकणे आदी साऱ्याच वैशिष्ट्यपूर्ण घटना या कुठल्या दैवी चमत्कारांपेक्षा अल्प नव्हत्या. त्यामुळे क्रूरकर्मा शत्रूही अवाक् झाला होता. स्वतःच्या प्राणांची तमा न बाळगता त्यांनी मानवी रूपातील अनेक दैत्यांचे पारिपत्य केले. पुढे हिंदूंच्या रक्षणासाठी महाराजांनी स्वतःला विधिवत राज्याभिषेक करवून घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापनेची घोषणा केली ! शेकडो वर्षे दक्षिण आणि उत्तर हिंदुस्थानात यवनी राजवटींनी हैदोस घातला होता. मोगल सत्ता उलथून श्रींचे राज्य स्थापन करणे हा छत्रपती शिवाजी महाराजांचा हेतू होता. आवश्यक अशा त्यागाचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये निर्माण झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या तहाच्या आडून सर्वोत्कृष्ट आणि धाडसी चाल आखली. तहानुसार त्यांनी औरंगजेबाला २३ किल्ले परत दिले. त्या कालावधीत महाराजांनी राजा जयसिंहास विजापूरच्या स्वारीवर साहाय्य करून विजय मिळवून दिला. त्यामुळे प्रसन्न होऊन औरंगजेबाने चर्चा करण्यासाठी महाराजांना आग्रा येथे येण्याचे निमत्रंण दिले. या संधीचा लाभ उठवण्याचा धाडसी निर्णय महाराजांनी घेतला. औरंगजेबाच्या दरबारात हिंदुस्थानातील अनेक हिंदु राजे आणि सरदार चाकरीला होते. भरलेल्या दरबारात महाराजांनी प्रवेश केला आणि मी हिंदु राजा असतांना मला सरदारांच्या रांगेत उभे केले, असे म्हणून ते मोगल बादशहा औरंगजेबासमोर उभे राहून सर्वांसमोर त्याचा अपमान करून भर दरबारातून निघून गेले. त्यामुळे औरंगजेबाने महाराजांना अटक करून नजरकैदेत ठेवले आणि त्यांना ठार मारण्याची योजना आखली; मात्र महाराज अलौकिक साहस, बुद्धीमत्ता यांच्या क्षमतेवर स्वराज्यात सुखरूप परत आले.

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई .**

महाराजांच्या या सुटकेने प्रेरणा घेऊन अनेक हिंदू मोगलांविरुद्ध उभे राहिले. आसाममधील लाच्छित बडफूकन हा त्यापैकीच एक वीर योद्धा मोगलांविरुद्ध लढला. औरंगजेबाचा सेनापती राजा जयसिंहाचा मुलगा राजा रामसिंग हा शिवाजी महाराजांचा हितचिंतक झाला. उत्तर हिंदुस्थानातून भूषणसारखे कवी आणि छत्रसाल बुंदेलासारखे वीर महाराजांच्या आश्रयाला आले. छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा येथील मोहीम ही हिंदवी स्वराज्य स्थापनेतील निर्णायक मोहीम ठरली.

महाराज आग्रा येथून निसटल्यावर मोगल साम्राज्यास उतरती कळा लागली. पुरंदरच्या तहात द्यावे लागलेले सर्व किल्ले आणि प्रदेश महाराजांनी पुन्हा जिंकून घेतले. महाराजांना अनेक हिंदू राजे आणि सरदार यांचे सहकार्य मिळू लागले. छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी त्याला स्वतःला ५ लाखांच्या सैन्यानिशी दक्षिणेची मोहीम उघडावी लागली. आदिलशाही आणि निजामशाही त्याने १-२ दिवसांतच संपवली; मात्र स्वसामर्थ्याची जाणीव झालेल्या मराठ्यांनी त्याला जवळपास २५ वर्षे झुंजवले आणि शेवटी त्याचा याच हिंदवी स्वराज्यात मृत्यू झाला.

कवी भूषण म्हणतात, शिवाजी महाराजांनी वेदांचे, प्रसिद्ध पुराणांचे रक्षण केले. जिव्हेवर रामनाम ठेवले. हिंदूंची शेंडी राखली. शिपायांची रोटी राखली. खांद्यावरच्या जानव्याचे आणि गळ्यातल्या माळेचे रक्षण केले. मोगलांना थोपवले. बादशहाला धाक घातला. शत्रूंना चक्की पिसायला लावली. सीमांचे रक्षण केले. तलवारीच्या बळावर देव, देश आणि स्वधर्म यांचे रक्षण केले अन् या सर्वांतून हिंदूच्या मनात जाज्वल्य प्रेरणाशक्ती निर्माण केली.

■ ■

# छत्रपती संभाजी महाराजांविषयी विकीपीडियावर आक्षेपार्ह मजकूर

## मुख्यमंत्र्यांनी घेतली गंभीर दखल

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**
छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी विकीपीडियावर वादग्रस्त व चुकीची माहिती देण्यात आली आहे. यामुळे शिवप्रेमींचे मने दुखावली गेली आहेत. तसेच तो वादग्रस्त व चुकीचा मजकूर विकीपीडियावरून काढून टाकण्यात यावा अशी मागणी केली जात आहे.

यात आणखी भर म्हणजे देशद्रोही फेम अभिनेता कमाल खानने देखील छत्रपती संभाजी महाराजांविषयीचा चुकीचा मजकूर शेअर केला आहे. हा वादग्रस्त मजकूर खरा असल्याचा दावा त्याने केला आहे. यामुळे आणखी वाद पेटला आहे. या सर्वांची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे.

या प्रकरणावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, सायबर विभागाच्या आयजींना विकीपीडियाशी बोलून तो मजकूर तातडीने हटवण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. विकीपीडियावर अशा प्रकारचे लिखाण राहणे चुकीचे आहे. विकीपीडिया भारतातून चालत नाही. तो ओपन सोर्स प्लॅटफॉर्म आहे. पण ऐतिहासिक घटना, व्यक्तींबद्दल असे लिहिले जाऊ नये यासाठी नियमावली तयार करा, असे विकीपीडियाला सांगण्यात येणार आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

फडणवीस म्हणाले, प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र आहे. पण त्याला एक सीमा आहे. तुम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले म्हणून तुम्ही दुसऱ्याच्या अभिव्यक्तीवर घाला घालू शकत नाही. जिथे अश्लीलता परिसीमेच्या बाहेर जाते, तिथे कारवाई होणारच. असे ते म्हणाले.

**अमोल कोल्हे यांची नाराजी**

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका साकारणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी देखील या प्रकरणावर नाराजी व्यक्त केली आहे.

कुठेतरी छत्रपती संभाजी महाराजांची ओळख पुसण्यामध्ये, वर्षानुवर्षे बरेच काही लिहिले गेले, चुकीचे मजकूर जोडले गेले आणि त्याचेच प्रतिबिंब म्हणजे आता ही विकिपिडियावर दिसणारी माहिती आहे.

सर्व मुद्दे, आक्षेपार्ह मजकूर लिहून त्यानंतर बलिदान अधोरेखित करणे हे चालूच आहे आणि तेच पुन्हा अत्यंत दुर्दैवीपणे पाहायला मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सरकारने लवकरात लवकर यासंदभार्तील सूचना जारी करत जनमानसाच्या भावनांचा आदर करावा अशीही मागणी केली.

दरम्यान, या प्रकरणावर आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही नाराजी व्यक्त करीत सडकून टीका केली आहे.

# श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले

श्री संत गजानन महाराज प्रकट दिन

■ **महासागर प्रतिनिधी**
**शेगाव, दि. १८ :**
श्रींच्या १४७ व्या प्रगटदिनाच्या निमित्ताने राज्यासह देशभरातून श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी होणारी भाविक भक्तांची गर्दी लक्षात घेऊन भक्तांची गैरसोय टाळण्यासाठी श्री संस्थानच्या वतीने प्रगटदिनाचे आदल्या दिवशी म्हणजेच बुधवार १९ फेब्रुवारी रोजी रात्री तसेच प्रगटदिन वार गुरुवार २० फेब्रुवारी असे दोन दिवस श्रींचे मंदिर भाविक भक्तांना दर्शनासाठी रात्रभर खुले ठेव८२ जाणार आहे.

२० फेब्रुवारी रोजी श्री संत गजानन महाराज प्रगटदिन असल्याने या दिवशी सकाळी १० ते १२ दरम्यान हभप भरत बुवा पाटील मु. म्हैसवाडी यांचे शेगावी श्रीच्या प्रागट्या निमित्त किर्तन होईल.

सकाळी १० वाजता श्री महारूद्रस्वाहाकार यागाची पुणार्हूती, अवभृतस्नान होईल. दुपारी ४ वाजता उत्सवांची पालखी अश्व, रथ, मेणासह परिक्रमा करीता निघेल.

२१ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते ८ दरम्यान हभप श्रीराम बुवा ठाकरे मु. लातूर यांचे काल्याचे किर्तन होईल व या प्रगटदिन उत्सावाची सांगता होणार आहे. श्री प्रगटदिन उत्सावात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश या ठिकाणाहून भजनीदिंडया दाखल होत आहेत. गजानन अवलीया अवतरले जग तराया, ज्ञानेबुवा तुकाराम नामघोष करित शेगांव शहरात भजनी दिंडयाचे आगमन होत असून शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

श्री संस्थान कडून भक्तांच्या सोयीसाठी श्रींचे दर्शनसाठी एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यात दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण मंडप, श्रींची गादी व पलंग तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था केली आहे. भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासामध्ये नियमानुसार अल्पदरात राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे.

भक्तांना कोणताही त्रास होवू नये यास्तव श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत. या उत्सव काळात सर्वतोपरी सोयीसुविधा संस्थानच्यावतीने पुरविल्या जात आहेत. दरम्यान, शेगावी भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याचे दिसून येत आहे.







श्रीच्या प्रगट दिनानिमित्त श्रींचे संस्थांच्यावतीने सलग दोन दिवस १९ बुधवार व २० गुरुवार रोजी 'श्री' चे मंदिर दर्शनासाठी २४ तास खुले राहणार आहे.

**संतनगरीत दोन दिवस महाप्रसाद वितरण...**

श्री गजानन सेवा समितीच्या वतीने श्रींचे प्रगटदिन उत्सवानिमित्त शहरात येणाऱ्या भजनी दिंडी व भाविक भक्तांसाठी बुधवार दि. १९ व गुरुवार दि.२० फेब्रुवारीला असे दोन दिवस अखंडपणे महाप्रसाद वितरण शहरातील श्री अग्रेसन भवन येथे सुरू राहणार आहे. उत्सवासाठी येणाऱ्या भजनी दिंड्यांमधील वारकरी, भाविक भक्त व पंचक्रोशीतील भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री गजानन सेवा समिती शेगाव-नागपूर- अकोटचे वतीने करण्यात आले आहे.

# अनधिकृत मच्छीमारी रोखण्यासाठी अंमलबजावणी कक्ष स्थापन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
राज्याच्या सागरी किनाऱ्यांवर होणाऱ्या एलईडी आणि अनधिकृत परप्रांतीय मासेमारीला रोखण्यासाठी तसेच सागरी सुरक्षा मजबूत करण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने विशेष अंमलबजावणी कक्ष स्थापन केला आहे. राज्याच्या समुद्री किनाऱ्यांवर आता ड्रोनचीही नजर राहणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिली.

राज्यातील स्थानिक मच्छीमार अनेक वर्षांपासून अनधिकृत मासेमारीविरोधात कारवाईची मागणी करत होते. परप्रांतीय नौकांकडून होणाऱ्या मच्छीमारीमुळे त्यांचा व्यवसाय प्रभावित होत होता. हे लक्षात घेऊन हा अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात आल्याचे राणे यांनी स्पष्ट केले.

सागरी सुरक्षेसाठी किनारपट्टी भागात ड्रोनच्या माध्यमातून गस्त सुरू करण्यात आली आहे. परिणामी, परप्रांतीय मासेमारी नौकांवर नियंत्रण आणण्यास मदत होत आहे. यामुळे स्थानिक पारंपरिक मच्छीमारांचे हित जपण्यास मदत होईल. एलईडी मासेमारीवर कठोर कारवाई करण्याची शासनाची भूमिका स्पष्ट असून, या माध्यमातून अनधिकृत हालचालींवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. या अंमलबजावणी कक्षाच्या माध्यमातून किनारपट्टीवरचे अतिक्रमण हटवण्यासाठीही कार्यवाही केली जाणार आहे.

## अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला अधिक बळ

**३६४ नव्या पदांना मान्यता**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
राज्यात दीड वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला आता अधिक मनुष्यबळ मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने ३६४ नव्या पदांना आणि त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी दिली आहे.

या टास्क फोर्ससाठी आवश्यक असलेल्या ३४६ नियमित आणि ३६ बाह्य पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली. नियमित पदांमध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस उपमहानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार, शिपाई, चालक आणि लिपिकीय कर्मचारी यांचा समावेश आहे. बाह्य यंत्रणेद्वारे वैज्ञानिक सहाय्यक, विधी अधिकारी, कार्यालयीन शिपाई आणि सफाई कर्मचारी यांची भरती केली जाणार आहे. या उपक्रमासाठी वार्षिक १९ कोटी २४ लाख रुपये आणि वाहन खरेदीसाठी ३ कोटी १२ लाख रुपये खर्चास मंजुरी मिळाली आहे.

## अवैध देह व्यापाराचा संशय, पोलिसांनी छापा टाकताच सत्य उघड

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १८ :**
अकोला शहरातील एका भागामध्ये भाड्याच्या घरात बाहेर जिल्ह्यातील चार महिला गेल्या काही दिवसांपासून राहात आहेत. त्या ठिकाणी अवैध देह व्यापार चालवला जात असल्याच्या संशयावरून परिसरातील नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला.मात्र, भलतेच वास्तव समोर आले. चार महिलांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांना सोडून देण्यात आले आहे.

शहरातील वाशीम बायपास भागातील गंगा नगर परिसरामध्ये एक घर भाड्याने देण्यासाठी मालकाने दलालाकडे दिले होते. त्या दलालाने चार महिला त्या भाड्याच्या घरात आणून ठेवल्या. त्या महिलांच्या हालचाली व वागण्यावरून स्थानिकांना संशय आला. त्या घरांमध्ये देह व्यापार चालवला जात असल्याच्या अंदाजावरून स्थानिक महिलांनी घरावर धडक दिली. घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलीस ठाण्याच्या पथकासह शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या पथकाने संशयित चार महिला व एका पुरुषाला पोलिसांनी ताब्यात घेतले.

घटनास्थळावर पोलिसांनी पडताळणी केली. त्या घरामध्ये ४० ते ४५ वयोगटातील चार महिला आढळून आल्या. स्थानिक नागरिकांनी देह व्यापाराचा गंभीर आरोप केला. मात्र, स्थानिक नागरिकांच्या संशयानुसार कोणतेही ठोस पुरावे त्या घरात आढळून आले नाहीत. पोलिसांनी त्या महिलांना ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई केली. महिलांविरोधात प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

: मुलखावेगळी माणसं :



**छोटा मोटिव्हेशन स्पीकर- रिधान**

**लोकमानस**

पुणे हे विद्येचं माहेरघर मानले जाते. याच पुण्यातील अनेक लोकांनी अनेकविध प्रकारचे विक्रम केलेले आहेत.पुण्यातून चांगले उद्योजक तयार झाले,शिक्षणतज्ज्ञ देखील तयार झाले. संगीत, नाटक, सिनेमात पुणेकरांचे योगदान मोठे आहे. प्रत्येक क्षेत्रात पुणेकरांनी आपली कामगिरी बजावलेली आहे. आता पुणे शहरातील एका छोट्या मुलाने फार मोठी कामगिरी केली आहे.

हा मुलगा चक्क मोटिव्हेशन स्पीकर म्हणून चांगले भाषण देतो. त्याच्या भाषणाचे अनेक कार्यक्रम झालेले आहेत. त्यामुळे या मुलाच्या या विक्रमाची नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये देखील केली गेली आहे. पुण्यातील रिधान जैन हा छोटा मुलगा मोटिव्हेशनल स्पीकर झालेला आहे तोही सर्वात कमी वयाचा मोटिव्हेशनल स्पीकर बनला आहे.

रिधानचे वय फक्त नऊ वर्ष असून तो पुण्याव्यतिरिक्त इतर राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रेरणादायी भाषण देतो. चौथ्या इयत्तेत शिकणाऱ्या रिधान याने पुणे शहर आणि इतर ठिकाणी ५० हुन अधिक ठिकाणी मोटिव्हेशनल भाषण दिलेली आहेत. तो फक्त मुलांसमोर प्रेरणादायी विचार मांडतो असं नाही तर, युवक आणि जेष्ठासमोर देखील त्याचे कार्यक्रम होत असतात. रिधान सर्जनशीलता,चिकाटी,आणि शिस्त या विषयावर भर देत आपले विचार आणि प्रेरणादायी भाषण देत असतो. वाचनाचे तसेच लेखनाचे आपल्या आयुष्यत करिअरच्या दृष्टिकोनातून किती महत्व आहे? हे तो छोटी छोटी उदाहरण देऊन एकाच वेळी शेकडो श्रोत्यांना अक्षरश मंत्रमुगध करत असतो.

रिधान याचा मोटिव्हेशनल स्पीकर म्हणून जो प्रवास सुरु झाला तो वयाच्या सातव्या वर्षी लेखक म्हणू सुरु झाला आहे. सातव्या वषार्चा असताना त्याने सर्वप्रथम 'वन्स अपॉन इन माय माईंड 'हे पहिले पुस्तक लिहिलें होते. आपल्या स्वप्नाचा पाठलाग कसा करावा? आणि स्वप्नां पूर्ती करण्यासाठी कोणत्या दिशेने अंर्गक्रमण करावे हे त्याने या पुस्तकात सविस्तर लिहिले होते. त्याचे हे पुस्तक तरुण वाचकांना मार्गदर्शन करणारे असेच होते.

रिधानचे हे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर त्याला व्याख्यानासाठी अनेक आमंत्रणे येऊ लागली आणि त्याची वाटचाल मोटिव्हेशनल स्पीकर म्हणून सुरु झाली. एक उत्तम आणि प्रभावी वक्ता म्हणून तयार होण्यासाठी रिधानला त्याच्या आईवडिलांचे आणि शिक्षकांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभलेले आहे. त्यातूनच तो घडत गेला.

रिधानचा आतापर्यंत अनेक संस्थांनी सन्मान देखील केला आहे. रिधान सध्या आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करत असून त्याला भविष्यकाळात माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातच नाव कमवायचे आहे. लहान वयातील या महान कला अंगी असलेल्या रिधानचे एक आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ होणायचे स्वप्न नक्कीच पूर्ण होणार हे वेगळे सांगायला नकोच.

■ ■ ■

**प्रेमपुरी आश्रमात श्री राधा-कृष्ण यांच्या मधुर लिलांचा सत्संग**



अनंत श्री विभूषित जगद्गुरु श्री प्रियदशीर्जी महाराज यांच्या 'श्री कृष्ण चरित मानस' या रसायण महाकाव्याच्या माध्यमातून, पुन्हा एकदा श्री प्रेमपुरी आश्रम, मुंबई येथे श्री राधा-कृष्ण यांच्या मधुर लीलांचे १५ दिवसीय सत्संग आयोजित करण्यात आले आहे.सत्संग हा मनुष्य जीवनाचा अत्यंत महत्वपूर्ण भाग आहे. आपल्या वर्तमान जीवनामध्ये आपण कशा पद्धतीने गोष्टी निवडतो, कोणत्या गोष्टीला प्राधान्य देतो, हे आपल्या बुद्धिवर अवलंबून असते. या विचाराचे विवेचन पहिल्याच दिवशी करण्यात आले.

ब्रज रस रसिक श्री लीला रसिक जी मार्गदर्शन करताना भक्तांना म्हणाले की, मानवी देह हा किती मूल्यवान आहे! जेव्हा भगवंताची कृपा होते, तेव्हा आपल्याला मनुष्य योनि प्राप्त होते. त्यामुळे आपल्याला ह्या न त्या कारणाने आपला देह हा भगवंत प्राप्तीसाठी वाहून दिला पाहिजे.

ब्रज रस रसिका श्रीमति राधा रश्मि जी भक्तांचे विवेचन करताना म्हणाल्या की, आपलं जीवन हे खूप अमूल्य आहे, त्यामुळे आपल्याला ते नाम संकीर्तनामध्ये विलीन केलं पाहिजे, गुरु भगवंताच्या सानिध्यात राहून साधना केली पाहिजे, कारण सत्संगाचे सार-तत्व हेच आहे. विवेकी होऊन, साधनेचा मार्ग अवलंबून आपले ध्येय गाठले पाहिजे.

ब्रज रस रसिक डॉ. कृष्ण किंकर यांनी श्री कृष्ण चरित मानस श्रवण करण्याचे महत्त्व सांगितले. 'श्री कृष्ण चरित' श्रवण करून, अधोगतीच्या मार्गावर असलेला, धर्मात भ्रष्ट झालेला किंवा कोणत्याही प्रकारच्या गुंतागुंतीत अडकलेला मनुष्यही 'श्रीकृष्ण चरित' श्रवण करून हळूहळू आपला भरकटलेला मार्गावरून सुधारित मार्गावर येऊ शकतो. त्याचबरोबर प्रभूजींनी मे 2025 मध्ये (22 मे 2025 ते 28 मे 2025 या कालावधीत) श्री वृंदावन धाम येथे तिसऱ्यांदा होणाऱ्या 13.5 कोटी नामसंकीर्तनाची माहितीही श्रोत्यांना दिली आणि या महोत्सवात श्रीमहातम्यांच्या चरणांचे दर्शन घेण्याचीही संधी मिळणार असल्याचे सांगितले. ■ ■ ■

: वाद संवाद :

### पर्यावरण रक्षणासाठी पर्यायी इंधन ही काळाची गरज आहे का?

**दीपक वाघ, राज्य समन्वयक,भारत पेट्रोलियम**

■ होय आपण मागील अनेक वर्षांपासून पेट्रोल,डिझेल,सीएनजी सारख्या जीवाष्म इंधनाचा वापर करत आहोत. अर्थात पूर्वी या जीवाष्म इंधनाचे साठे मुबलक होते. मात्र आता हे नैसर्गिक साठे संपत चाललेले आहेत. सरावात महत्वाचं म्हणजे या जीवाष्म इंधनाच्या ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणात वातावरणात कार्बनडायॉकसाईड आणि कार्बन मोनॅक्ससाईड सारखे अत्यंत विषारी वायू सर्रास वातावरणात सोडले गेल्याने हवा आणि वातावरण प्रदूषित बनलेले आहे. या विषारी वायूमुळेच जनमानसात फुफ्फसांचे भयंकर विकार देखील बलावत आहेत. म्हणूनच आता काळाची गरज म्हणून पर्यावरण शुद्ध राखायचे असेल तर इलेक्ट्रिक ऊर्जा,सौर ऊर्जा यासारख्या पयार्यी इंधनाचा वापर वाढवणं गरजेचं आहे. हि पयार्यी इंधन स्वस्त आणि पर्यावरण रक्षक आहेत. हरित ऊर्जा आणि पर्यावरणाचे संरक्षण हे आपल्याच हाती आहे.

**नीरज खत्री, पर्यावरण अभ्यासक**

■ पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज आहे हे नक्की मात्र त्यासाठी पारंपरिक जीवाष्म इंधनाचा वापर थांबवून पयार्यी नैसर्गिक इंधनाचा वापर करायचा हि गोष्ट वाटते तितकी वास्तवात सोपी नाही. कारण इलेक्ट्रिक ऊर्जा हि काही प्रमाणात मर्यादित आहे. हेच सौरऊर्जेच्या बाबतीत आहे. पावसाळ्यात चार महिने सौर ऊजेर्चा वापर अशक्य आहे. आणि आपल्याकडे संपूर्ण देशभरात इलेक्टिक चार्जिंग स्टेशन्स देखील अत्यंत मर्यादित आहेत. अशा वेळी पेट्रोल,डिझेल,सीएनजी गॅस हि पारंपारिक इंधन हि आणखी काही वर्ष तरी आपली सर्वांची गरज आहे. अर्थात हे नैसर्गिक जीवाष्म इंधन वापरताना प्रदूषण मोठ्या प्रमाणात होणार नाही यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने काळजी घ्यायला हवी.

■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## 'मातोश्री'समोर नतमस्तक होत सेनेला रामराम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
ठाकरे गटातील अनेक पदाधिकारी शिंदे गटात प्रवेश करत आहेत. मुंबईतील विलेपार्ल्याचे उपविभागप्रमुख जितेंद्र जनावळे यांनी देखील पक्षाला सोडचिट्ठी दिली आहे. जनावळे यांच्या पक्ष सोडण्याची बातमी समजताच उद्धव ठाकरेंनी त्यांना चचेर्साठी बोलावले. जनावळे आज मातोश्रीवर दाखल झाल्यानंतर त्यांनी मनातील खदखद बोलून दाखवत अनिल परब आणि संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला. तसेच उद्धव ठाकरेंची भेटीनंतर बाहेर आल्यावर त्यांनी मातोश्रीसमोर डोकं टेकवून नमस्कार केला.





विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे गटाला चांगलीच गळती लागल्याचे चित्र आहे. अनेक पदाधिकारी पक्षाला रामराम ठोकत आहेत. पक्षाचा होणारा डॅमेज कंट्रोल होण्यासाठी ठाकरे गटाकडून प्रयत्न सुरू आहेत. उद्धव ठाकरे लोकप्रतिनिधींच्या बैठका घेत आहेत. नाराज लोकांची मनधरणी करण्याचा प्रतत्न त्यांच्याकडून सुरू आहे. जितेंद्र जनावळे यांनी सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला. ते २० फेब्रुवारी रोजी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत.

विलेपार्ले विधानसभेबाबत निर्णय घेणारे संजय राऊत आणि अनिल परब कोण आहेत? यांनी ही विधानसभा आम आदमी पक्षाला दिली होती. त्यावेळी आम्ही उद्धव ठाकरेंना भेटून झाडूचा प्रचार करायला आमचा विरोध असल्याचे ठामपणे सांगितले. त्यामुळे ती जागा शिवसेनेकडे आली. भाजपकडून ती जागा काढून शिवसेनेकडे घ्यायची माझी इच्छा होती. पण, मला बाहेरच्या वॉर्डात टाकले. म्हणजे तुम्हाला शिवसेनेला जिंकवायचे आहे की भाजपला जिंकवायचे आहे? असा सवाल करत जितेंद्र जनावळे यांनी आपल्या मनातील खदखद बोलून दाखवली.

## सुरेश धसांनी घेतली डीजीपी रश्मी शुक्लांची भेट

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :**
काही अधिकाऱ्यांचे गुन्हेगारांना पाठबळ असल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केले आहे. सुरेश धस यांनी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची भेट घेत वादग्रस्त अधिकाऱ्यांची व एकाच ठिकाणी 15-15 वर्षे बसून राहणाऱ्या अधिकाऱ्यांची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच महादेव मुंडे यांच्या आरोपींना लवकरच अटक होईल, असा विश्वास देखील सुरेश धस यांनी दिला आहे.

कृष्णा आंधळे संभाजीनगर येथे पोलिस भरतीची तयारी करत होता. नंतर तो गुन्हेगारीकडे वळला. जे काही गुन्हे त्याने केले आहे या गुन्ह्यामध्ये तो या पूर्वी सुद्धा घरादाराची फिकीर न करता बाहेर पळाला आहे. माझी सुद्धा इच्छा आहे तो लवकरात लवकर सापडला पाहिजे.

सुरेश धस म्हणाले, संतोष देशमुख यांच्या बदनामीचा कट होता. संतोष देशमुख यांना कळंब येथे नेण्याचा कट रचण्यात आला होता. कळंबमध्ये एक बाई सुद्धा तयार करून ठेवली होती. याप्रकरणी सुद्धा कसून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सुरेश धस यांनी केली.

## गुणवत्तेवर नोकऱ्या देणारे 'अण्णा' यांचे निधन

■ **वृत्तसंस्था**
**छ. संभाजीनगर, दि. १८ :**
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे



माजी सरचिटणीस, मराठवाडा साहित्य परिषदेचे विश्वस्त, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सदस्य तथा प्रसिद्ध उद्योगपती मधुकरअण्णा मुळे यांचे मंगळवारी प्रदिर्घ आजाराने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. गरीब विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी कायम तत्पर असणारे मुळे हे शैक्षणिक क्षेत्रात अण्णा म्हणून ओळखले जायचे.

मधुकरअण्णा मुळे यांना त्यांच्या सामाजिक उपक्रमांसाठी आणि महाराष्ट्रातील शेतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून अनेक पुरस्कार मिळालेत. ते ग्रीन गोल्ड सीड्सचे संस्थापक अध्यक्ष देखील होते. मराठवाडा साहित्य परिषदेचे मधुकर अण्णा मुळे हे विश्वस्त मंडळाचे चेअरमन होते. त्यांचाच काळात यशवंतराव चव्हाण नाट्यगृह झाले. त्यांनी यासाठी शरद पवारांच्या मदतीने मसापला निधी मिळवून दिला.

# धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला का?

## मुंडे कॅबिनेटला गैरहजर राहिल्याने दमानियांनी काढला चिमटा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
मंत्री धनंजय मुंडे यांनी आजच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला दांडी मारल्याच्या मुद्यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी त्यांच्यासह उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचा चिमटा काढला आहे. धनंजय मुंडे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीला गैरहजर होते. त्यामुळे अजित पवारांनी त्यांचा राजीनामा घेतला की काय? घेतला असेल तर आनंदच आहे, असे त्यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. पण या बैठकीला मंत्री धनंजय मुंडे यांनी दांडी मारली. याविषयी विविध अटकळी व्यक्त केल्या जात असताना अंजली दमानिया यांनी अजित पवारांनी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला की काय? असा प्रश्न करत त्यांचा चांगलाच चिमटा काढला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या, धनंजय मुंडे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीला गैरहजर राहिले. हा अतिशय इंटरेस्टिंग मुद्दा आहे. आज पण ते कॅबिनेटला अनुपस्थित असतील, तर त्यांनी कुठे राजीनामा दिला आहे की काय? असा प्रश्न पडतो. मागच्या वेळी डोळ्यांची शस्त्रक्रिया झाल्यामुळे ते बैठकीला आले नसल्याचे सांगण्यात आले होते. पण आजही ते अनुपस्थित असतील तर त्याचे कारण काय हे अजित पवारांनी सांगावे. त्यांचा राजीनामा घेतला आहे की काय? घेतला असेल तर आनंदच आहे.

**धस यांची विश्वासार्हता संपली**

अंजली दमानिया यांनी यावेळी संतोष देशमुख हत्या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांची विश्वासार्हता संपल्याचाही आरोप केला. सुरेश धस यांच्याविषयी आता मला काहीही बोलायचे नाही. कारण, त्यांची विश्वासार्हता संपली आहे. सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली असेल तर चांगलेच आहे. पण या भेटीचा अद्याप काहीही परिणाम झाल्याचे दिसत नाही.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आजपर्यंत एकाही गोष्टीची पूर्तता झाली नाही. पोलिसांना 9 डिसेंबर रोजी सापडलेल्या 2 मोबाईलचा डेटा अजून आला नाही. सीडीआर मिळाला नाही. डेटा रिकव्हर करण्यास अडीच महिने लागले तरी हाती काहीच नाही. आणखी किती वेळ लागणार हे ही माहिती नाही. 19 जून रोजी सातपुडा बंगल्यावर या प्रकरणाशी संबंधित एखादी बैठक झाली असेल तर त्यावर काही कारवाई का झाली नाही? हे सर्व प्रश्न अनुत्तरीत आहेत.

अंजली दमानिया यांनी यावेळी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांना उपोषण करण्याऐवजी संबंधितांना धडा शिकवण्याचे आवाहन केले. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे आमरण उपोषण करत आहे. असे उपोषण केल्याने काहीही होणार नाही. या लोकंना आपण धडा शिकवला पाहिजे. हा विषय धरून आपण लढण्याची गरज आहे. कोणतेही राजकारणी यांना भावना नसल्याचे त्या म्हणाल्या.